
सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २०५ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## शालेय पोषण आहार कामगारांच्या मागण्यांसंदर्भात पाठपुरावा करणार : भुसे



मुंबई : शालेय पोषण आहार कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत शालेय शिक्षण विभाग सकारात्मक असून त्यांच्या मानधनामध्ये वाढ व्हावी यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येईल, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले.

शालेय पोषण आहार कामगारांच्या प्रलंबित मागण्यांसाठी कामगारांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक घेण्यात आली. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव तुषार महाजन, संचालक (प्राथमिक) शरद गोसावी, शालेय पोषण आहार कामगार संघटना फेडरेशन (सिटू) तसेच शिवशक्ती शालेय पोषण आहार स्वयंपाकी मदतनीस व ठेकेदार संघटनेच्या शिष्टमंडळातील पदाधिकारी आणि प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते. शालेय शिक्षण मंत्री श्री.भुसे म्हणाले, शालेय पोषण कामगारांच्या मानधनामध्ये केंद्र आणि राज्य सरकारचा हिस्सा आहे. केंद्राच्या हिशामध्ये वाढ करण्याबाबत ९ एप्रिल २०२५ च्या पत्रान्वये केंद्र सरकारकडे विनंती करण्यात आली आहे, त्याचा पाठपुरावा करण्यात येईल. शालेय पोषण कामगारांबाबत यापूर्वी राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याला प्राधान्य देण्यात येईल.

# महामार्गांवर असणार आता ठेकेदारांच नाव आणि पत्ताही

नवी दिल्ली : आता प्रत्येक महामार्गाच्या सर्व एन्ट्री पॉइंटवर सहज दिसेल असा मोठा फलक लावला जाईल. या फलकावर संबंधित महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराचे नाव आणि त्या रस्त्याची जबाबदारी ज्या सरकारी अधिकाऱ्याकडे आहे त्याचेही नाव तसेच संपर्क क्रमांक दिसतील अशा पद्धतीने झळकवले जातील. ही माहिती क्यू आर स्वरुपात दिली जाईल. कोड स्कॅन करताच सामान्यांना त्यांच्या मोबाईलवर माहिती मिळेल. या पद्धतीने महामार्ग मंत्रालय अप्रत्यक्षपणे महामार्गाच्या गुणवत्तेवर नियंत्रण ठेवणार आहे. ही माहिती केंद्रीय महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी दिली आहे.




कंत्राटदार आणि अधिकारी यांचे साटेलोटे मोडून काढण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. यामुळे कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांवर एक प्रकारचे नैतिक दडपण निर्माण होईल, असा विश्वास केंद्रीय महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला आहे.

दोषींवर कडक कारवाई

सध्या महामार्ग मंत्रालयाने देशातील विविध रस्ते योजनांचा आढावा घेण्याचे काम सुरू केले आहे. त्यात दोषी आढळणाऱ्यांच्या विरोधात कारवाई केली जाईल, असे संकेत गडकरींनी दिले. महामार्ग मंत्रालयाच्या महसुलाची रक्कम ५५ हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे. येत्या २ वर्षात ही रक्कम १ लाख कोटींवर नेण्याचं संकल्प आम्ही केला आहे. देशातील रस्ते जागतिक दर्जाचे असले पाहिजेत यात वादच नाही मात्र त्यापेक्षाही या रस्त्यांचा दर्जा सांभाळणे आणि त्यांची नियमित देखभाल करणे या गोष्टी अधिक महत्वाच्या आहेत. असे गडकरी यांनी सांगितले.

जनतेकडे एनएचआयकडे तक्रारीची सुविधा

महामार्गांवर अनेकदा आपत्कालीन परिस्तिथी ओढवते. अश्या वेळी प्रवाशांना तातडीने मदत मिळणे गरजेचे असते. त्यामुळे प्रवाशांना मदतीसाठी क्यूआर कोडची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. याद्वारे प्रवाशांना सर्वप्रकारची मदत तातडीने मिळणार आहे. या माध्यमातून प्रवासी आपली तक्रार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण किंवा अन्य संबंधित प्राधिकरणाकडे नोंदवू शकतील, असेही गडकरी म्हणाले.

## शेतकरी, पशुपालकांना वीज दरात सवलत मिळणार, पण 'या' अटींवर...

मुंबई : राज्य शासनाने पशुपालन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय घेतला आहे. यानुसार आता वीजदरात सवलतीचा लाभ देण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून यामुळे पशुपालकांना वीज दर सवलतीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यामुळे ग्रामीण भागातील पशुपालन व्यवसायाला चालना मिळून शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस हातभार लागणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली आहे.

पशुजन्य उत्पादित बाबींस मूल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेती प्रमाणे गट पध्दतीने पशुसंवर्धन, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ होईल, पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी कृषी इतर या वर्गवारीनुसार न करता कृषी वर्गवारीप्रमाणे वीज आकारणी करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार आता यासंबंधीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. यामुळे पशुपालन व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना वीज दर सवलतीचा लाभ मिळणार आहे. यासंबंधीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या शासन निर्णयानुसार खालील अटी पूर्ण करणाऱ्या पशुपालकांना सवलतीचा लाभ दिला जाईल :

पशुधन मर्यादा : २५ ,००० पर्यंत मांसल कुक्कुट पक्षी किंवा ५०,००० पर्यंत अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी, ४५,००० पर्यंत क्षमतेच्या हॅचरी युनिट, १०० पर्यंत दुधाळ जनावरांचा गोठा, ५०० पर्यंत मेंढी किंवा शेळी गोठा, २०० पर्यंत वराह (डुक्कर)

सवलतीचा लाभ मिळवण्यासाठी संबंधित पशुपालन प्रकल्पांनी जिल्हा उपायुक्त (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांच्याकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. तसेच प्रकल्पातील सर्व पशुधनाची नोंद एनडीएलएम (भारत पशुधन पोर्टल) वर करावी लागेल. पशुपालन प्रकल्पाकरिता स्वतंत्र वीज मीटर असणेही बंधनकारक आहे.

## देशात एआय क्रांतीला गती देण्यासाठी रिलायन्स आणि गुगल बनले नवे भागीदार

### प्रति युजर ३५१०० किमतीच्या जिओ वापरकर्त्यांना १८ महिन्यांचा गुगल एआय प्रो अँक्सेस मोफत

भारतात संस्थांना एआय हार्डवेअर अँक्सिलरेटर्सची अधिक अँक्सेस प्रदान करण्यासाठी रिलायन्स इंटेलिजेंस गुगल क्लाउडसाठी एक धोरणात्मक भागीदार

भारतातील संस्थांमध्ये एजंटिक एआयला पुढे नेण्यासाठी रिलायन्स इंटेलिजेंस जेमिनी एंटरप्राइझचा अवलंब करणार



मुंबई: रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (ठखङ) आणि गुगलने आज संपूर्ण भारतात आर्टिफिशियल इंटेलिजेंस (-ख) चा अवलंब वाढवण्यासाठी एक विस्तृत धोरणात्मक भागीदारीची घोषणा आज केली आहे. रिलायन्सच्या एआय फॉर ऑल व्हिजनच्या अनुरूप ग्राहक एंटरप्राइजेस आणि डेव्हलपर्सना सक्षम बनवणे हे असल्याचे कंपनीने आपल्या निवेदनात नमूद केले आहे. माहितीनुसार, हे सहकार्य रिलायन्सचे अतुलनीय स्केल, कनेक्टिव्हिटी आणि इकोसिस्टम पोहोच गुगलच्या जागतिक दर्जाच्या एआय तंत्रज्ञानासह एकत्र आणते. एकत्रितपणे, हे उपक्रम एआय अँक्सेसचे लोकशाहीकरण आणि भारताच्या एआय-चालित भविष्यासाठी डिजिटल पाया मजबूत करण्याच्या उद्देशाने आहेत असे कंपनीने भागीदारीविषयी व्यक्त करताना स्पष्ट केले.

रिलायन्स इंटेलिजेंसच्या भागीदारीत, गुगल, गुगलचा एआय प्रो प्लॅन आणि गुगल जेमिनीची नवीनतम आवृत्ती पात्र जिओ वापरकर्त्यांसाठी १८ महिन्यांसाठी मोफत सादर करण्यास सुरुवात करणार आहे. या ऑफरमध्ये जेमिनी अँपमध्ये गुगलच्या सर्वात सक्षम जेमिनी २.५ प्रो मॉडेलची उच्च प्रवेश क्षमता, त्यांच्या अत्याधुनिक नॅनो बनाना आणि व्हिओ ३.१ मॉडेल्ससह आश्चर्यकारक प्रतिमा आणि व्हिडिओ जनरेट करण्यासाठी उच्च मर्यादा, अभ्यास आणि संशोधनासाठी नोटबुक एलएमची विस्तारित प्रवेश क्षमता, २ टीबी क्लाउड स्टोरेज आणि बरेच काही समाविष्ट आहे. १८ महिन्यांची ही ऑफर ३५१०० किमतीची आहे असे कंपनीने आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. पात्र जिओ वापरकर्ते मायजिओ अँपद्वारे ही ऑफर सहजपणे सक्रिय करू शकतील असे कंपनीने म्हटले. कंपनीच्या मते, भारतातील तरुणांना सक्षम बनवण्याच्या जिओच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंबित करून १८ ते २५ वयोगटातील वापरकर्त्यांसाठी अमर्यादित ५जी प्लॅनवर लवकर प्रवेशासह रोलआउट सुरू होईल आणि शक्य तितक्या कमी वेळेत देशभरातील प्रत्येक जिओ ग्राहकाचा समावेश करण्यासाठी वेगाने विस्तार केला जाईल. कंपनीच्या व्यवस्थापनाने यावेळी म्हटले आहे की ही भागीदारी भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि भाषिक विविधतेला पूरक ठरणारी, जिओ वापरकर्त्यांना एआयद्वारे समर्थित अधिक आनंददायी स्थानिक अनुभव देण्याचा प्रयत्न करेल. मल्टी-जीडब्ल्यू, स्वच्छ ऊर्जेवर चालणारी, अत्याधुनिक सार्वभौम संगणक क्षमता निर्माण करण्याच्या त्यांच्या दृष्टिकोनाच्या अनुषंगाने, रिलायन्स त्यांच्या प्रगत एआय हार्डवेअर ऑक्सिलरेटर्स, टेन्सर प्रोसेसिंग युनिट्स (टीपीयू) पर्यंत प्रवेश विस्तृत करण्यासाठी गुगल क्लाउडसोबत भागीदारीची घोषणा करत आहे.

## पवईतील आर ए स्टुडिओमध्ये थरार

### शूटिंगच्या नावाखाली ओलीस ठेवलेल्या १७ मुलांची सुटका, एन्काउंटरमध्ये आरोपी ठार

मुंबई : पवई परिसरात घडलेल्या एका भीषण घटनेने संपूर्ण मुंबई हादरली. 'शूटिंग ऑडिशन'च्या नावाखाली सुरू असलेल्या उपक्रमादरम्यान आर ए स्टुडिओमध्ये एका व्यक्तीने १७ मुला-मुलींसह एका ज्येष्ठ आणि एक सामान्य नागरिकाला ओलीस ठेवले होते. पोलिसांनी वेळेत हस्तक्षेप करत ओलीस ठेवलेल्या सर्वांची सुखरूप सुटका केली. यावेळी झालेल्या चकमकीत अर्थात एन्काउंटरमध्ये गंभीर जखमी झालेल्या आरोपी रोहित आर्यचा नंतर मृत्यू झाला.

पवई परिसरातील एका स्टुडिओमध्ये एका वेब सीरिजच्या ऑडिशनसाठी सुमारे १०० पेक्षा जास्त मुलं आली होती. आरोपी रोहित आर्यने यापैकी बहुतांश मुलांना घरी पाठवून फक्त १७ मुले आणि २ नागरिकांना ओलीस ठेवले. काही वेळातच त्याने स्वतःचा व्हिडीओ प्रसारित करत आपल्यावर अन्याय झाल्याचा दावा केला आणि प्रशासनाशी संवादाची मागणी केली.

घटनेची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दल आणि एनएसजी कमांडो घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी आरोपीशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला, मात्र परिस्थिती बिघडत गेल्याने अखेर गोळीबार करण्यात आला. एअरगन सोबत ठेवून अनेकांना ओलीस ठेवणाऱ्या रोहित आर्यने पोलिसांवर गोळी झाडली. पोलिसांनीही प्रत्युत्तरात गोळीबार केला. सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल वाघमारे यांनी झाडलेली गोळी आर्यच्या छातीत लागली आणि उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

रोहित आर्य हा पुण्याचा रहिवासी असून, त्याने यापूर्वी शासनाकडे थकबाकीबाबत तक्रार केली होती. एका शाळेच्या दुरुस्तीचे पैसे न दिल्याचा आरोप त्याने केला होता. याच प्रकरणात तो काही महिन्यांपासून उपोषण करत होता.

आरोपीने एका व्हिडीओमध्ये सांगितले होते की, मला या मुलांना काहीच करायचं नाही. मात्र मला काही लोकांशी बोलायचं आहे, चर्चा करायची आहे, माझ्या प्रश्नांची उत्तरं मिळवायची आहेत. मला कोणी रोखण्याचा, इथे येण्याचा प्रयत्न केला तर या मुलांबरोबर काही वाईट घडलं तर त्यास मी जबाबदार नसेन. दरम्यान, पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे १९ निष्पाप जीव सुखरूप सुटले असून परिसरात मोठ्या प्रमाणावर सुरक्षा तैनात करण्यात आली आहे. या घटनेमुळे शहरात आणि पालकांमध्ये चिंतेचं वातावरण निर्माण झालं आहे.

## 'मोंथा' चक्रीवादळामुळे ब्रिटीशकालीन जहाज आले किनाऱ्याजवळ!



ओडिशा: 'मोंथा' चक्रीवादळामुळे समुद्र खवळलेला आहे. लाटांचा जोर वाढला आहे. या लाटांच्या जोराने एका जहाजाचा सांगाडा नासिरू किनाऱ्यावर पाण्यात तरंगताना दिसू लागला आहे. बंगालच्या उपसागरात, ओडिशातील गहीरमाथा समुद्री अभयारण्याजवळ हे जहाज बुडालेल्या स्थितीमध्ये आढळले होते. ते जहाज आता चक्रीवादळामुळे नासिरू किनाऱ्याजवळून दिसू लागले आहे.

वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी या जहाजाच्या रचनेवरून ते ब्रिटिशकालीन असावे असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला आहे. साधारणपणे भरतीच्या वेळी हे अवशेष पाण्याखाली जात आहेत. आता चक्रीवादळामुळे समुद्रातील हालचालींना वेग आल्याने या जहाजाचा सांगाडा अधिक स्पष्टपणे बाहेर आल्याचे दिसत आहे.

सुमारे दहा वर्षांपूर्वीही या जहाजाचे अवशेष दिसले होते, पण नंतर ते पुन्हा समुद्रात गडप झाले. आता चक्रीवादळामुळे ते पुन्हा वर आले आहेत. हे जहाज कुठून आले, कधी आणि कोणत्या कारणामुळे बुडाले, याबद्दल अधिक तपास करणे आवश्यक असल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

## बिहार निवडणूक २०२५ : फिलोदी सट्टा बाजारानं निवडणुकीच्या निकालाविषयी केलं भाकीत

पाटणा : बिहारमध्ये निवडणुकीचं तापमान चढलं असलं तरी सगळ्यांची नजर आता राजस्थानच्या प्रसिद्ध फिलोदी सट्टा बाजारावर आहे. इथं सट्ट्याचे भाव अक्षरशः चढ-उतार घेत आहेत, पण सध्या एनडीएच्या बाजूने हवा दिसतेय.

सट्टा बाजारात एनडीए आघाडीवर

फिलोदी सट्टा बाजारात एनडीएच्या सरकारची शक्यता सर्वाधिक दाखवली जात आहे. सट्टेबाज सांगतात, जर





एनडीएवर १००० ची बाजी लावली, तर त्याचा परतावा २००० पर्यंत मिळू शकतो.

जागांचा अंदाज:

एनडीए: १२८ ते १३२ जागा ( तर १३५-१३८ पर्यंतही अंदाज)

महागठबंधन: ९७ ते १०० जागा.

सध्याच्या चित्रात एनडीएला स्पष्ट आघाडी मिळाल्याचं दिसतं, तर महागठबंधनचा ग्राफ हळूहळू खाली जातोय.

मुख्यमंत्री या पदासाठी नितीश कुमारच आघाडीवर:

सट्टा बाजारात नीतीश कुमार यांच्या नावाचे भाव ४०-४५ पैशांवर स्थिर आहेत. मुख्यमंत्री या पदासाठी नितीश कुमार आघाडीवर आहेत.

महागठबंधनची स्थिती चिंताजनक

महागठबंधन १०० पेक्षा कमी जागांपर्यंतच मर्यादित राहील, असा अंदाज सट्टेबाजांनी व्यक्त केला आहे.

मतदानाच्या तारखा आणि पुढील अंदाज:

बिहारमध्ये दोन टप्प्यांत मतदान ६ आणि ११ नोव्हेंबरला होणार आहे. सट्टेबाजांच्या मते, प्रचाराची गती वाढेल तसतसे बाजारातील आकडे, मतदारसंघांचे भावही बदलू शकतात.

एकूणच, फिलोदी सट्टा बाजारात सध्या एनडीएला हिरवा सिग्नल आणि महागठबंधनला लाल दिवा दिसून येतोय!

## संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुनील राऊत यांचे निधन

पुणे, ३० ऑक्टोबर : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते, सिंहगड भागाचे संघचालक, तसेच 'कौशिक आश्रम' संस्थेचे अध्यक्ष, उद्योजक सुनील मधुकरराव राऊत (वय ६९) यांचे गुरुवारी (दि. ३०) पहाटे राहत्या घरी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, जावई आणि नात असा परिवार आहे.

श्री. राऊत हे १९६४ पासून संघाचे स्वयंसेवक होते. व्यवसायाने इलेक्ट्रिकल इंजिनियर असलेल्या राऊत यांनी काही काळ नोकरी आणि नंतर यशस्वी व्यवसाय केला. त्यानंतर त्यांनी परदेशातही काही वर्षे काम केले. संघाचे तृतीय वर्ष शिक्षित असलेले श्री. राऊत यांनी कोल्हापूर जिल्ह्यात तीन वर्षे प्रचारक म्हणून पूर्णवेळ काम केले होते.



पुण्यातील विविध सामाजिक दायित्वांमध्ये त्यांनी मोलाचे योगदान दिले. संघाच्या सिंहगड भागाचे संघचालक अशी जबाबदारी त्यांच्यावर होती. त्याबरोबरच 'कौशिक आश्रम' आणि 'अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान' या संस्थांचे अध्यक्ष म्हणूनही ते काम पहात होते. त्यांनी पर्वती भाग बौद्धिक प्रमुख, पर्वती भाग सहकार्यवाह, सिंहगड भाग समरसता गतीविधी प्रमुख अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. चार वर्षे त्यांनी विवेकानंद नगर संघचालक म्हणूनही काम पाहिले. पुण्यात आयोजित शिवशक्ती संगममध्ये त्यांच्यावर 'सिद्धांत केंद्र प्रमुख' अशी महत्त्वाची जबाबदारी होती. सुनील राऊत यांच्यावर वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. संघाचे महानगर संघचालक रवींद्रजी वंजारवाडकर, भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष धीरज घाटे, प्रसाद लवळेकर, प्रा. हर्षवर्धन खरे, सेनादत्त सहकारी संस्था आणि नवचैतन्य क्रीडा संघ यांच्या वतीने मुकुंद रणपिसे तसेच राऊत कुटुंबीयांच्या वतीने महेश रोकडे यांनी श्रद्धांजली अर्पण केली. गेली अनेक वर्षे संघ कार्यातील साऱ्या जबाबदाऱ्या अत्यंत निष्ठेने राऊत यांनी पार पाडल्या, अशा शब्दात वंजारवाडकर यांनी यांनी राऊत यांना श्रद्धांजली अर्पण केली.

### बोगस आधार कार्ड प्रकरणी आ. रोहित पवारांविरोधात गुन्हा

मुंबई : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे बोगस आधार कार्ड तयार केल्याप्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दक्षिण मुंबईतील सायबर पोलीस ठाण्यात हा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. भाजपाचे सोशल मीडिया सहसंयोजक धनंजय वागस्कर यांच्या तक्रारीनुसार पोलिसांनी ही कारवाई केली आहे. रोहित पवारांनी बनावट आधारकार्ड कसं तयार केलं जातं याचं प्रात्यक्षिक करुन दाखवलं होतं.

## लग्नात नववधूने फक्त तीनच सोन्याचे दागिने परिधान करावे, पंचायतीचे निर्देश

उत्तराखंड : दिवसेंदिवस सोन्याच्या आणि चांदीच्या किमती या गगनाला भिडत आहेत. भारतीय परंपरेनुसार आपण बहुतेक सणांमध्ये, लग्नात दागिने घालतोच पण हल्ली दागिने खरेदी सर्व सामान्य लोकांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. हिच एकूण परिस्थिती लक्षात घेऊन भारतातील एका गावाने एक महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. त्यामुळे दागिन्यांवर खर्च कमी होईल.



उत्तराखंड मधील अनुसूचित जनजाती क्षेत्र जौनसार भागातील एका पंचायतीनं सोडलेला हे फर्मान महिलांनी किती सोन्याचे दागिने घालावेत याबाबत आहे. या पंचायतीनं लग्न किंवा इतर समारंभात तीन पेक्षा जास्त सोन्याचे दागिने घालण्यावर बंदी घातली आहे.

महिलांनी सोन्याचे दागिने घालण्याबाबतचा हा नियम कंजाड आणि इंद्रोली गावात लागू करण्यात आला आहे. महिलांना कानातील झुमके, नाकातील नथ आणि मंगळसूत्र हे तिचे सोन्याचे दागिने घालण्याची सवलत देण्यात आली आहे. दोन गावांच्या संयुक्त पंचायतीनं या नियमांचं उल्लंघन करण्याऱ्या संबंधित व्यक्तीला ५० हजार रुपयाचा दंड ठोठावला आहे. दरम्यान कंदाड येथील रहिवासी असलेल्या अर्जुन सिंह यांनी सोन्याच्या वाढत्या किमतीमुळे हा निर्णय घेतल्याचं सांगितलं.

# बाबासाहेब बारगळ पाटील यांचा शिंदे शिव सेनेत प्रवेश



खुलताबाद प्रतिनिधी खुलताबाद येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे शिवसेना उद्योग आघाडीचे उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब काशिनाथ बारगळ पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसोबत शिवसेना शिंदे गटात प्रवेश करून महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री शिवसेना पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या विकासात्मक दृष्टिकोन सक्षम नेतृत्व गोरगरिबांसाठी विविध विकासात्मक धोरण या सर्व गोष्टी विचार करून आज छत्रपती संभाजीनगर येथे खासदार संदिपान जी भुमरे पाटील , यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश केला.या प्रवेशामुळे खुलताबाद शहरात, व तालुक्यात शिव सेना वाढवण्यासाठी नव्या जुन्या शिवसैनिकां ना सोबत घेऊन नगर परिषद जिल्हा परिषद .पंचायत समिती .निवडणुकी त, पक्षाला विजय मिळवण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री संजयजी शिरसाट खासदार संदिपान जी भुमरे माजी आमदार अण्णासाहेब माने माजी आमदार कैलास पाटील जिल्हाप्रमुख राजेंद्र जंजाळ यांच्या नेतृत्वात पक्षा चे एक निष्ठेने काम करू व पक्ष देईल ती जबाबदारी पार पाडू असे. छत्रपती संभाजीनगर येथे खासदार संदिपान भुमरे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रवेश सोहळ्या दरम्यान दिली. पांडुरंग काळे. उमेश बारगळ, यांचेही प्रवेशादरम्यान उपस्थिती होती.उपजिल्हा प्रमुख दिलीप सिंग राजपूत. गंगापुर तालुका प्रमुख दिलीप भाऊ निरफळ रत्नपुर तालुका प्रमुख विशाल खोसरे.माजी सभापति किशोर बाप्पू कुकलारे. दादासाहेब निकम पाटील पोपट वेताळ . माजी जि प सदस्य मोहन चंदवाडे निखिल चव्हाण. .युवराज नलावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा संपन्न झाला

## आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना गोधन दान

छत्रपती संभाजीनगर- अतिवृष्टी आणि पुरामुळे मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यांतील शेतकरी बांधवांच्या संसारावर संकट कोसळलं. या संकटाच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड येथील हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट यांच्या वतीने मराठवाड्यासाठी 'एक हात गोधन दानाचा' या उपक्रमाचा शुभारंभ भाजपाचे प्रदेशाध्यक्ष आमदार रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भोसरीचे आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने हा उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात १०० गाईंचे 'गोदान पूजन' रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले.

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क. २८०/२०२५

अर्जदारः-१. नामदेव नथ्थुजी शिंदे, वय ८६ वर्षे, (मुलगा), बाबुराव नथ्थु शिंदे (मुलगा) मयताचे वारस २. बेबाबाई बाबुराव शिंदे, वय ६५ वर्षे, (सुन), क. १ व २ रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर. ३. सौ. प्रतिभा सुनिल मराठे, वय ४१ वर्षे, (नात), रा. जामनेर, ता. जामनेर, जि. जळगांव. ४. सौ. मनिषा रविंद्र पवार, वय ३७ वर्षे, (नात) रा. जळगांव, ता. जि. जळगांव. ५. सौ. सुरेखा उमेश हरणे, वय ३९ वर्षे, (नात), रा. कासारखेड, ता. बाळापुर, जि. अकोला, ह.मु. जामनेर, ता. जामनेर, जि. जळगांव. ६. सौ. रेखा विष्णू जाधव, वय ३५ वर्षे, (नात) रा. शिरसगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव. ७. श्री. गोविंद बाबुराव शिंदे, वय ३२ वर्षे, (नातु) रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदारः-निरंक

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डी. आर. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत नथ्थु धनजी शिंदे हे दि. ०१/०४/१९८७ रोजी जरंडी, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ६ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ६ हे मयत नथ्थु धनजी शिंदे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल युभी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २८/११/२०२५.

आज दि. २९/१०/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

**मा. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर सोयगांव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज कः २७९/२०२५

अर्जदारः १ बेबाबाई बाबुराव शिंदे, वय ६५ वर्षे, (पत्नी), रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. सौ. प्रतिभा सुनिल मराठे, वय ४१ वर्षे, (मुलगी), रा. जामनेर, ता. जामनेर, जि. जळगांव. ३. सौ. मनिषा रविंद्र पवार, वय ३७ वर्षे, (मुलगी) रा. जळगांव, ता. जि. जळगांव. ४. सौ. सुरेखा उमेश हरणे, वय ३९ वर्षे, (मुलगी), रा. कासारखेड, ता. बाळापुर, जि. अकोला, ह.मु. जामनेर, ता. जामनेर, जि. जळगांव. ५. सौ. रेखा विष्णू जाधव, वय ३५ वर्षे, (मुलगी) रा. शिरसगांव, ता. चाळीसगांव, जि. जळगांव.

६. श्री. गोविंद बाबुराव शिंदे, वय ३२ वर्षे, (मुलगा) रा. जरंडी, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदारः-निरंक

प्रकरण : वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. डी. आर. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. मयत बाबुराव नध्यु शिंदे हे दि. २७/०३/२०२३ रोजी जरंडी, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर येथे त्यांचा मृत्यू झालेला असून त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क. १ ते ६ हे वारस आहे. असा अर्ज न्यायालयात वकीलांमार्फत दाखल आहे. अर्जदार क. १ ते ६ हे मयत बाबुराव नथ्थु शिंदे यांचे वारस असुन त्यांना शासकीय व निम शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनद्वारे प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्री सह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदारांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २८/११/२०२५.

आज दि. २९/१०/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर सोयगांव

**उपविभागीय अधिकारी वैजापूर, जिल्हा छत्रपती संभाजीनगर**
**(महसूल विभाग)**

वाचा :- १. श्री. सौरभ रमेश देवळे, व इतर रा. गंगापूर यांचा विनंती अर्ज दिनांक २१/०२/२०२५
२. तहसिलदार गंगापूर यांचा अहवाल जाक्र २०२५/भूसुधार/इनाम/कावि-१०२ दिनांक १२/०९/२०२५
जा.क्र. २०२५/भूसुधार/कावी - ४७२ — दिनांक १४/१०/२०२५

## जाहीर प्रगटन

या द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की मौजे. गंगापुर आबेवाडी, घोडेगाव, ता. गंगापूर. जि. छत्रपती मौजे. लासुरगाव, बल्लाळीसागज, ता वैजापूर संभाजीनगर यांना या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री. सौरभ रमेश देवळे, श्रीमती. सुनिता रमेश देवळे, सौ. रश्मी सागर पाठक, रा. गंगापूर यांनी अर्ज सादर करून त्यांचे वडील श्री. रमेश उत्तम देवळे, हे दिनांक २८/०९/२०२४ रोजी निधन झाले अत्तून मौजे. गंगापूर सर्वे न १६० क्षेत्र १७ एकर १९ आर आआंबेवाडी सर्वे न ०८ क्षेत्र १५ एकर ३५ आर आआंबेवाडी सर्वे नं १३. १ एकर ३४ आर घोडेगाव सर्वे नं ८६, १९ एकर १० आर लासुरगाव सर्वे नं ३४, क्षेत्र १७ एकर ०५ आर वल्लाळीसागज सर्वे नं १४/२ ६ एकर १९ आर एकोड़ीसागज सर्वे नं ५४४ एकर ०८ आर असे एकूण क्षेत्र ८३ एकर ०८ आर पैकी अशोक लक्ष्मीकांत देवळे व रमेश उत्तमराव देवळे यांना एकत्रीत १/३ रमेश उत्तमराव देवळे यांच्या हिश्याच्या हद्दीपर्यंत श्री. विठोवा व श्री. बालाजी मंदिर गंगापूर, इनाम देवस्थान विरासत कार्यवाही करण्या बाबत विनंती केलेली आहे.

सवव प्रकरणातील उक्त वारसाचे कार्यवाहीत ज्या कोणाचे हितसंबंध असतील त्यांनी हे जाहीर प्रगटन तारखेपासून १५ दिवसाच्या आत कोणाचे काही आक्षेप असल्यास आपल्याकडील पुराव्यासह लेखी स्वरूपात आक्षेप या कार्यालयास सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदाराच्या नावे हैद्राबाद अतियात कायदा १९५२ सुधारीत चौकशी नियम १९५४ (१२) क अन्वये विरासत कार्यवाही करण्यात येईल,

उपविभागीय अधिकारी वैजापूर

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

## जाहीर प्रगटन

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.: २६२/२०२५.

अर्जदारः १) भालचंद्र काशिनाथ सिनकर वयः ९० वर्षे, धंदा शेती, २) प्रदिप भालचंद्र सिनकर वयः ३४ वर्षे, धंदा शेती, ३) सुनिल भालचंद्र सिनकर, वय ३० वर्षे, धंदा शेती, यरील रा. वनगांव ता. सोयगांव जि. छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ४) गीता भालचंद्र कोठावदे, वयः ३९ वर्षे, धंदा शेती, रा. शिंदाड ता. पांचालय जि जळगांव ५) भारती माधव सोनजे, वयः ३६ वर्षे, धंदाः शेती. रा. ओतुर ता. कळवण जि नाशिक

// विरूध्द //

गैरअर्जदारः-निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयता नामे - रमाबाई भालचंद्र सिनकर हे दिनांकः- ०१/०८/२०२५ ला मौजे वनगांव ता. सोयगांव जि छ संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक : ३०/१०/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :-२९/१०/२०२५.ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

सोलापूर तरुण भारत — CHANGE IN NAME

**old name : NAVEEN SWARUPCHAND PARTWAR**
**NEW NAME : NAVIN SWARUPCHAND PARATWAR**
**Address : BHAaTT COLONY TQ DI : HINGOLI 431513**
**Mob : 7020583707**

## जाहीर प्रगटन

**मा.विधाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७३५/२०२५

पुढील तारीख १५/१२/२०२५

व्दारकाबाई परसराम कऱ्हाळे व इतर

विरुध्द

निरंक

प्रकरण - Bombay Regulation Act 1857 मधील कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी मयत परसराम आबाराव कऱ्हाळे हे दि.०७/०९/२०२४ रोजी हेडगेवार हॉस्पीटल, औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १. व्दारकाबाई परसराम कऱ्हाळे, २. नारायण परसराम कऱ्हाळे, ३. योगीता बाबासाहेब कोरडे, रा.आलापुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद ४. वैशाली विनोद सोमवंशी, रा.म्हस्की, ता. वैजापुर, जि. औरंगाबाद ५. कविता परसराम कऱ्हाळे, अर्जदार नं. १, २ व ५ रा.शिरेगाव, ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड.श्री.बी.पी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ५ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा, मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि.२९/१०/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**साहेब मा. एन. आर. ढोके साहेब दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. ४४५/२०२५ — पुढील तारीख ०५/१२/२०२५

अर्जदार : १. ज्योती भ्र. बाबासाहेब साबळे, वयः २८ वर्ष, धंदाः शेती, रा. लाडसावंगी, ता. फुलंब्री जि. औरंगाबाद. २. रुपाली राहुल जाधव, वयः २४ वर्ष, धंदाः शेती रा. यशवंत नगर सिल्लोड, ता. सिल्लोड जि. औरंगाबाद. ३. मयुर भावडु शिंदे वयः १९ वर्ष, धंदाः शिक्षण रा. नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. आश्विनी भ्र. भावडु शिंदे वयः ७२ वर्ष, धंदाः घरकाम रा.नागापुर, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः महाराष्ट्र शासन. व्दारा जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद.

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ४ चे वडील व अर्जदार क्र. ४ चे पति मयत नामे भावडु किसन शिंदे यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.एस. आर. राऊत यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र. १ ते ४ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. मयत नामे भावडु किसन शिंदे यांचे अर्जदार क्र. १ ते ३ चे वडील असुन अर्जदार क्र. ४ हिचे पति आहे. मयत नामे भावडु किसन शिंदे यांना अर्जदार क्र. १ ते व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत. मयत भावडु किसन शिंदे हे दि. १८/१०/२०२४ रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार हा औरंगाबाद येथे करण्यात आलेला आहे. मयत भावडु किसन शिंदे यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिः३०/१०/२०२५

आदेशावरुन

कनिष्ट लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणि न्यायाधिश क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.एन.आर. ढोके दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या कोर्टात.**

दि.कि. अर्ज क्र. ४७३/२०२५ — पुढील तारीख. ०५/११/२०२५.

अर्जदार :- १. पठाण रियानाबी युनूसखा, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. गार का बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. जुबेर खान युनूस खान, वय ४२ वर्षे, धंदा शेती, रा. गार का बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. जुनेद युनुस खान, वय ४० वर्षे, धंदा शेती. रा. बडा बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. खान हारुन युनूस खान, वय ३७ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. गार का बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. खान आलम युनूस, वय ३५ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. गार का बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६. शाहरुख खान युनूस खान, वय ३१ वर्षे, धंदा व्यवसाय, रा. गार का बंगला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ७. अमरीन भ्र. जफर शेख, वय २६ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुवर्ण पालेश्वर कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : निरंक

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ३ प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. एम.एच. सय्यद यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ही मयत कासम बाबामिया शेख यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ व ३ हे मयत कासम बाबामिया शेख यांचे मुले आहेत. अर्जदार क्रं. २ व ३ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. १ ही त्याची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत कासम बाबा मिया शेख यांचे कायदेशीर वारस आहे. मयत कासम बाबामिया शेख यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील नामे कासम बाबामिया शेख हे दि. २८/११/२०२४ रोजी मोजे कन्नड येथे वृद्धपकाळामुळे मरण पावले आहे. सोबत मयत कासम बाबामिया शेख यांचे नगर पालिका कन्नड यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे. तसेच मयताची आई अमिनाबी बाबामिया शेख व वडील बाबामिया शेख हे मयताच्या बालपणीच मयत झालेले आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांना मयत कासम बाबामिया शेख यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय. उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्य आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे व मयत कासम बाबामिया शेख हे मोजे कन्नड ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी होते तसेच ते कन्नड येथे कन्नड येथे राहत असतांना वृद्धपकाळाने मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र.१ ते ३ ह वारस असून वेळोवेळो वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०५/०८/२०२५ रोजी मोजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापूर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज यापूर्वी इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वार सर्व जनतेस कळवण्यात येते को, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याहा स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षप वगैर मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक ३०/१०/२०२५.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायधीश क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क.स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ७३४/२०२५

कुसुम अशोकराव पाटील व इतर

विरुध्द

निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

ज्याअर्थी मयत अशोक राजाराम पाटील हे दि. ०५/०७/२०२५ रोजी औरंगाबाद महानगर पालिका हद्दीत मृत्यु पावले असुन अर्जदार नं. १) कुसुम अशोकराव पाटील, रा. प्लॉट नं. ३७, विरंगुळा, सहकार नगर, कांतीचौक, औरंगाबाद २) किरण अशोकराव पाटील, रा.घर नं. ७. डोणगाव, ता. गंगापुर जि.औरंगाबाद ३) मोनिका राजीव राजळे, रा. सिध्द सावली, कासारपिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर ४) वैशाली कैलास सावंत, रा.प्लॉट नं. १९. कृष्णाश्रय बेंगलो गंगापुर रोड, बोहरा पार्क जवळ, लोकमान्य नगर, गोले कॉलनी, नाशिक ५) राहुल अशोक पाटील, रा.प्लॉट नं. ३७, विरंगुळा, सहकार नगर, कांतीचौक, औरंगाबाद यांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड. श्री.पी.बी. जोशी, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी अर्जदार नं. १ ते ५ यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. सदरचे जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

दि. २७/१०/२०२५

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. एन.आर. ढोके. सहदिवाणी न्यायाधिश कनिष्ट स्तर कन्नड यांचे न्यायालयातुन**

किरकोळ अर्ज क्र-४८५/२०२५ — पु. तारीख : २१/११/ २०२५

अर्जदारः १- साहेबराव पि. माधवराव बोर्डे, वय-६५ वर्षे, धंदा- शेती, २- भास्कर पि. माधवराव बोर्डे, वय ६३, वर्षे, धंदा- शेती, अर्जदार क्र.१ व २ रा. घुसुर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३- मधुकर पि. माधवराव बोर्डे, वय-५५, वर्षे, धंदा- शेती, चिखलठाण, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

गैरअर्जदार : निरंक

अर्ज - वारसाचे प्रमाण पत्र मिळणे बाबत. Bombay Regulation Act

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकिल ॲड. एस. ई. धनेधर यांच्या मार्फत अर्जदाराने या न्यायालयात वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणुन अर्ज दाखल केला आहे. अर्जदाराचे वडील माधवराव उर्फ महादु मनाजी बोर्डे हे दिनांक २६/०३/१९९६ रोजी मौजे घुसुर ता. कन्नड येथे वृद्धापकाळाने वयाच्या ७५ व्यावर्षी मयत झालेले आहे तसेच मयताची पत्नी कलाबाई माधवराव उर्फ महादु बोर्डे या दिनांक-२१/१२/२०२३ रोजी मौजे घुसुर ता. कन्नड येथे मयत झाल्या आहे. मयत माधवराव उर्फ महादु मनाजी बोर्डे यांची आई देखील या पुर्वीच मौजे घुसुर येथे मयत झाल्या आहेत या पुढे सर्व मयताच्या नावाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मयत असे संबोधले जाईल. अर्जासोबत ग्रामपंचायत कार्यालय मौजे घुसुर ता. कन्ड यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. मयतांच्या नावाने मिळणारे शासकीय व निमशासकीय फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या ग्रामपंचायत, महसुल दप्तरी नोंदी वारस कायदया प्रामाणे संबंधीत रेकॉर्डला वारसाचे नावाची नोंद घेणेसाठी अर्जदारास वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे व ईतरही कायदेशीर कामासाठी सदरील वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे

ज्या अर्थी सदरहु जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत होवुन मिळण्या बाबत अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे. सबब या जाहीर प्रगटनाद्वारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कोणाचाही आक्षेप उजर असल्यास सदर जाहीर प्रगटण वर्तमाण पत्रात प्रकाशित झाल्या पासुज ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीशा किवा रीतसर वकिला मार्फत आवश्यक कागदपत्रासह आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयताचे कायदेशिर वारस असल्या बाबतचे वारस प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल सबब आज दिनांक / /२०२५ रोजी माझे सही निशी व मा. न्यायालयाच्या शिक्यामिशी दिले.

दिनांक१६/१०/२०२५

आदेशावरुन

कनिष्ट लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणि न्यायाधिश क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा.एन.आर. ढोके दिवाणी न्यायाधीश साहेब, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. ५०४/२०२५ — पुढील तारीख २९/११/२०२५

अर्जदार - १) विश्वंभर गोविंदा मोकासे वयः ४६ वर्ष धंदाः शेती, रा.शफेपुर पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २) शोभाबाई भ्र. सुदाम नवले, वयः ४४ वर्ष धंदाः घरकाम, रा. दिगर पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३) जनाबाई भ्र. ज्ञानेश्वर खडके, वयः ४२ वर्ष धंदाः घरकाम रा. दिगर पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४) रेवनाथ गोविंदा मोकासे मयत (मयत) ४-१) रुख्मणबाई भ्र. रेवनाथ मोकासे वयः ५० वर्ष धंदाः घरकाम, रा.शफेपुर पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४-२) विशाल रेवनाथ मोकासे वयः ३५ वर्ष धंदाः शेती, रा.शफेपुर पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४-३) रविंद्र रेवनाथ मोकासे वयः २८ वर्ष धंदाः शेती, रा.शफेपुर पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४-४) आश्विनी भ्र. ज्ञानेश्वर उखर्डे वयः ३२ वर्ष वर्ष, धंदाः शेती, रा.टेभुर्णी, ता. जाफ्राबाद जि. जालना ४-५) रोहिणी भ्र. ज्ञानेश्वर डहाके वयः ३० वर्ष धंदाः शेती, रा.शफेपुर पिशोर, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

अर्ज : अर्जदार क्र. १ ते ४-५ हे मयत नामे गोविंदा आनंदा मोकासे यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.डी.एफ. म्हस्के यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की. अर्जदार क्र, १ ते ४-५ हे वारस असुन मयत गोविंदा आनंदा मोकासे यांचे अर्जदार क्र. १ ते ४ मुले आहे तसेच अर्जदार क्र. ४-१ हि सुन असुन अर्जदार क्र. ४-२ ते ४-५ हे नातु आहेत. मयत गोविंदा आनंदा मोकासे हि दि. १९/१०/२०१४ रोजी मयत झाले असुन त्यांना अर्जदार क्र. १ ते ४-५ हे कायदेशीर वारस असुन अर्जदार क्र. १ ते ४-५ व्यतीरीक्त इतर कोणीही वारस नाहीत. मयत गोविंदा आनंदा मोकासे यांचा अंत्यसंस्कार हा पिशोर, ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. तसेच मयत गोविंदा आनंदा मोकासे यांचा मुलगा अर्जदार क्र. ४ मयत नामे रेवनाथ गोविंदा मोकासे हा देखील दिः २७/०४/२०१९ रोजी मयत झालेले आहे. तसेच गोविंदा आनंदा मोकासे यांच्या आई नामे साळाबाई आनंदा मोकासे या देखील खुप दिवसांपुर्वी मयत झालेल्या आहे व गोविंदा आनंदा मोकासे यांची पत्नी नामे अनुसयाबाई गोविंदा मोकासे ह्या देखील दिः १३/१०/२००१ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत गोविंदा आनंदा मोकासे यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर वारस नाहीत. मयत गोविंदा आनंदा मोकासे यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये वारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातुन वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्थी सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्या बाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उजेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

१७/१०/२०२५

आदेशावरुन

कनिष्ट लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२५/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यू नोंद/मिआर-४२

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक-२५-०८-२०२५

अर्जदार : श्री/श्रीम. संतोष इंदरचंद सत्तावन्न रा.खापरखेडा ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय खापरखेडा ता. कन्नड / ता. कन्नड जि. छ. संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ/ ॲड. मार्फत / स्वतः अर्ज मादर करून अर्जदार यांच्या मुलगाचे जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांचा मुलगा मोनू मंनोप मत्तावन्न चा जन्म. दिनांक २०-०१-२००७ रोजी खापरखेडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा चा जन्म दिनांक २०-०१-२००७ रोजी खापरखेडा ता. कन्नड / ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म/मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तमा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

मदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा सोनू संतोष सत्तावन्न यांचा जन्म दिनांक २०-०१-२००७ रोजी खापरखेडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणाम काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १५-१०-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक २०-०१-२००७ रोजी खापरखेडा ता. कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक........१०/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. डी. पाटील दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि.क्रि. अर्ज.क्रं. ५३४/२०२५. — पुढील तारीख १७/१२/२०२५.

अर्जदार :-'१. जुलेखाबी भ्र. युसूफ सय्यद, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवनगर, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. युनूस पिता युसूफ सय्यद, वय ३४ वर्षे, धंदा मजुरी, रा. बिस्मिल्ला कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. शोएब पिता युसूफ सय्यद, वय २८ वर्षे, धंदा मजुरी, रा. बिस्मिल्ला कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. सोहेल पिता युसूफ सय्यद, वय २८ वर्षे, धंदा मजुरी, रा. बिस्मिल्ला कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५. अंजूमबानो भ्र. अकबर खान पठाण, वय ३४ वर्षे, धंदा घरकाम, रा. काझी मोहल्ला, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस (Legal Heirship Certificate) प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. एम.एच. सय्यद यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत युसुफ सरदार सय्यद यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ते ४ हे मयातचे मुले असून अर्जदार क्र. ५ ही मयताची विवाहित मुलगी आहे. अर्जदार क्रं. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ बहिण असून अर्जदार क्र. १ ही त्याची आई आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत युसुफ सरदार सय्यद यांचे कायदेशीर वारस आहे. या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे युसुफ सरदार सय्यद हे दि. २१/१२/२०२३ रोजी मौजे कन्नड येथे मरण पावले आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांना मयत युसुफ सरदार सय्यद यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे व मयत युसुफ सरदार सय्यद हे मौजे कन्नड ता. कन्नड येथील मुळचे रहिवाशी आहेत तसेच मयत युसुफ सरदार सय्यद हे मौजे कन्नड येथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०६/१०/२०२५ रोजी मौजे कन्नड ता. कन्नड येथे घडले. अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज यापूर्वी इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वार सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा.न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारस प्रमाणपत्र दण्यात बेईल, त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नांद घ्यावी,

दिनांक ३०/१०/२००५

आदेशावरुन

कनिष्ट लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणि न्यायाधिश क. स्तर, कन्नड

# निवडणूकीत गोंधळ घालणाऱ्यांवर प्रतिबंधक कारवाई करा

## विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांनी गुरूवारी जिल्ह्याची कायदा व सुव्यवस्था आणि गुन्हेगारी नियंत्रण प्रणालीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी बीडचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर अधीक्षक सचिन पांडकर आणि चेतना तिडके यांची उपस्थिती होती.

विशेष पोलीस महानिरीक्षक मिश्र यांनी पोलीस दलाला थेट आणि कडक निर्देश दिले. मागील निवडणूक काळात गुन्हे दाखल असलेल्या आरोपींवर तातडीने प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. या बैठकीत शरीराविरुद्धचे गुन्हे, मालमत्तेविरोधातील गुन्हे, विशेषतः चोऱ्या आणि घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यास सांगण्यात आले. त्यांनी पोलिस उपअधीक्षक आणि स्थानिक गुन्हे शाखा यांनी अवैध धंद्यांवर केलेल्या कारवायांचा आढावा घेतला. तसेच, आर्थिक गुन्हे शाखा आणि सायबर सेलच्या प्रलंबित तपासावर लक्ष केंद्रित करण्यास सांगितले. अवैध धंद्यावर प्रभावी कारवाया करण्याच्या सूचना दिल्या.

अधिकारी अंमलदार यांचा गौरव

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा यावेळी प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये बीड शहर, पिंपळनेर, परळी शहर, अंबाजोगाई ग्रामीण, नेकनूर, सह सुमारे १५ ते २०



कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

पोलीस अधीक्षक वाचक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक वजूरकर हे नियत वयोमानानुसार उद्या दिनांक ३१/१०/२०२५ रोजी सेवानिवृत्त होत असल्यामुळे त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

हरवलेली मुलांसंदर्भात कारवाई करा

मिश्र यांनी फरार आरोपींचा शोध घेणे, हरवलेली लहान मुले आणि अपहृत मुली यांचा तपास करणे तसेच जप्त केलेला मुद्देमाल फिर्यादीला परत करण्यासाठी प्रयत्न करणे आणि प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढणे अशा सूचना दिल्या. त्यांनी तपासात ई-साक्ष पचा प्रभावी वापर करण्यावरही भर दिला.

# परळीत देश पातळीवरील भव्य पशुपक्षी प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकारातून परळीला देश पातळीवरील मोठा बहुमान मिळाला आहे. परळीच्या इतिहासात पहिल्यांदाच अनोखे व आगळे वेगळे असे देश पातळीवरील भव्य पशुपक्षी प्रदर्शन भरणार आहे. देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो हा परळीसाठी ऐतिहासिक बहुमान ठरणारा आहे.



राज्यातील पशुपालकांसाठी आणि कृषी क्षेत्राशी निगडित पशुसंवर्धन उद्योगांसाठी एक मोठी उपलब्धी म्हणून परळी वैजनाथ येथे १० ते १२ डिसेंबर २०२५ दरम्यान महापशुधन एक्स्पो २०२५ हे देशपातळीवरील पशुपक्षी प्रदर्शन आयोजित करण्यात येणार आहे. मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकारातून होत असलेल्या या प्रदर्शनासाठी शासनाने ५ कोटी ८४ लाख रूपये मंजूर केले असून याबाबतचा शासनादेश निर्गमित करण्यात आला आहे.

भारतीय पशुधन क्षेत्र हे जगातील सर्वात मोठे असून भारतात ११.६ टक्के पशुधन आहे. पशुपालन हा शेतकऱ्यांच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. महाराष्ट्रात पशुपालनातून शेतकऱ्यांना हमीपात्र उत्पन्न मिळत असून, ज्या भागात हा व्यवसाय प्रामुख्याने केला जातो, त्या भागात आत्महत्यांचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे आढळून आले आहे. राज्याच्या विकासात विदर्भ व मराठवाडा या भागांचा सकल देशांतर्गत उत्पादनातील (जीडीपी) वाटा कमी असल्याने तेथील शेतकऱ्यांना व पशुपालकांना प्रोत्साहन देणे अत्यावश्यक ठरते. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या संकल्पनेतून व पुढाकारातून परळीत अखिल भारतीय पशुप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे अखिल भारतीय पशुप्रदर्शन पशुपालकांना नवीन तंत्रज्ञान, उत्पादन क्षमता व प्रजनन क्षमता वाढविण्यासाठी प्रेरणा देणार आहे.

या प्रदर्शनात राज्यातील आणि राज्याबाहेरील देशभरातून विविध जातींचे जातीवंत व उत्कृष्ट पशुधन प्रदर्शित करण्यात येणार आहे. तसेच पशुसंवर्धन क्षेत्रातील व्यावसायिक, तज्ज्ञ आणि विविध संस्थांचे स्टॉल्स लावले जाणार असून अद्ययावत तंत्रज्ञान, उपकरणे आणि नव्या संधींची माहिती पशुपालकांना मिळणार आहे. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन आणि अंमलबजावणी पशुसंवर्धन आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. परळी वैजनाथ येथे होणारा हा महापशुधन एक्स्पो २०२५ राज्यातील पशुपालक, उद्योग, संशोधक आणि सामान्य नागरिकांसाठी एक प्रेरणादायी आणि ऐतिहासिक सोहळा ठरणार आहे.

# जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## पाच आरोपींना अटक, ३.४९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

दिनांक ३०/१०/२०२५ रोजी पिंपळनेर पोलिसांनी मौजे मैंदा शिवारात जुगार अड्ड्यावर छापा टाकून पाच इसमांना अटक केली आहे. आरोपींकडून ३,४९,४७०/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

कारवाईचा तपशील:

पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मैंदा शिवारात, मैंदा फाटा ते गाडीउतार तांडा रोडच्या उजव्या बाजूला विटभट्टीजवळ लिंबाच्या झाडाखाली मोकळ्या जागेत काही इसम बेकायदेशीररित्या 'तिरट' नावाचा जुगार खेळत व खेळवत आहेत.



या माहितीच्या आधारावर, पोलीस अंमलदार वैजिनाथ चंद्रकांत मगर यांच्या फिर्यादीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक मधुसूदन घूगे, आणि पोलीस उपनिरीक्षक अर्जुन गोलवाल यांच्या पथकाने सायंकाळी १६.३० वाजता अचानक छापा टाकला.

छाप्यादरम्यान, पाच इसम गोलाकारात बसलेले आणि जुगार खेळताना आढळून आले.

अटक आरोपींची नावे व जप्त मुद्देमाल:

पाच आरोपींची नावे:

सुभाष गोपिनाथ चव्हाण (वय ४० वर्षे)
गंपु गुंडीबा कसबे (वय ६० वर्षे)
दिलीप शिवाजी घोरड (वय ३२ वर्षे)
हनुमंत रामभाऊ लोकरे (वय ३८ वर्षे)
शिवाजी रंगनाथ कसबे (वय ५५ वर्षे)
सर्व रा. मैंदा, ता. जि. बीड.

जप्त केलेला मुद्देमाल: रोख रक्कम, मोबाईल, आणि पाच मोटारसायकली (हिरो स्प्लेंडर पल्स, बजाज डिस्कव्हर, बजाज बॉक्सर, बजाज प्लॅटीना) असा एकूण ३,४९,४७०/- (तीन लाख एकोणपन्नास हजार चारशे सत्तर रुपये) किमतीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला आहे.

गुन्हा दाखल:

या आरोपींविरुद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार बंदी कायदा प्रमाणे कायदेशीर फिर्याद नोंदविण्यात आली आहे. पुढील तपास पिंपळनेर पोलीस स्टेशन करत आहे.

सदर कारवाई मा पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपोअ सचिन पांडकर, उपविपोअ हनपुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक मधुसूदन घूगे, पो उप नी गोलवाल, पोलीस अंमलदार शेळके, गरजे, मगर, ढाकणे पठाण, विघ्ने, तावरे यांनी केली आहे.

# पायाभूत सोयी सुविधा अनुदान योजनेसाठी प्रस्ताव सादर करावेत

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

राज्यातील धार्मिक अल्पसंख्यांक बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्थां, नगरपालिका, नगरपरिषद शाळा व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना राबविण्यात येत आहे.

सदर योजना सन २०२५-२६ या वर्षात राबविण्यात येत असून संस्थाचालकांनी या योजनेसाठीचे परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, जिल्हा नियोजन समिती बीड या कार्यालास दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत सादर करावेत मुदतीनंतर प्राप्त प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाही याची नोंद घ्यावी, असे जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी, सुधाकर चिंचाणे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# शिक्षकांच्या दैनंदिन शालेय कामकाजातील विविध ऑनलाइन पचा भार कमी करावा - विजय रापतवार, अध्यक्ष शिक्षक मैत्री प्रतिष्ठान

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३० ऑक्टोबर**

महाराष्ट्र शासन आपल्या विविध शासकीय योजना राबविण्यासाठी ऑनलाइन पद्धतीच्या स्वरूपात विद्यार्थ्यांची व योजनांची माहिती ऍप् द्वारे शिक्षकांच्या कडून भरून घेत आहे. जिल्हा परिषद शाळा मध्ये कार्यरत असलेले शिक्षक दररोज ४० प्रकारची विविध प वापरत आहेत.



दररोज शिक्षकांना विविध ऑनलाईन प्स लिंक अहवाल सर्वेक्षण, तसेच त्यांच्या प्रशिक्षना मध्येच व्यस्त रहावे लागत आहे. सर्व वेगवेगळे मिळून एकूण ४० प्स आहेत ज्यामध्ये शिक्षकांना विद्यार्थ्यांना विद्यार्जनाचे काम सोडून यामध्येच व्यस्त रहावे लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ लागले आहे. हे ऑनलाइन काम करत असताना यांचे सर्व्हर कधी चालतं कधी चालतं नाही तर कधी कोणती तांत्रिक अडचण निर्माण होते आहे. त्यामुळे शिक्षक जवळपास दिवसभर यामध्येच व्यस्त असतात.व आपोआपच विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे.

ही बाब शासनाने गंभीर्याने लक्षात घेऊन शासनाने हे सर्व ४० प्स एकत्र करून शाळांच्या ऑनलाइन कामासाठी एकत्रित प्रणाली विकसित करून एकच प चालू करावे जेणेकरून शिक्षकांना कमी वेळेत हे सर्व ऑनलाईन कामे करता यावीत. जेणेकरून शिक्षकांना विद्यार्थ्यांच्या विद्या ज्ञानार्जयाकडेही पुरेसा वेळ देता येईल . पर्यायाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. यावर शासनाने गंभीर्याने विचार करून यावर उचित अशी कार्यवाही करावी अशी मागणी शिक्षक मैत्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रापतवार, उपाध्यक्ष पांडुरंग नरवडे व सचिव विष्णू सरवदे यांनी एका प्रसिद्धी पत्राद्वारे केली आहे.शिक्षकांना हाताळाव्या लागत असलेल्या विविध प्स मध्ये सरल, शालार्थ,मध्यान्ह भोजन, प्रेरणा, प्रेरणा डीबीटी,महाडीबीटी, दीक्षा रीड अलॉन्ग, निपुण प्लस, शारदा उल्हास भारत,समर्थ पोर्टल, विनोबा प, कर्मयोगी, हरितिमा, इको क्लब,एस आधार उमंग प, महास्कूल स्वच्छ सर्वेक्षण,फीट इंडिया, सूक्ष्म कवच, ज्ञान समीक्षा, परख अशा जवळपास एकूण ४० प्सवर शिक्षकाकडून दररोज हजेरी, सर्वेक्षण अहवाल आणि विविध शासकीय माहिती दररोज अनिवार्य पणे भरावी लागते.

विविध शासकीय व्हाट्सअप ग्रुप करून दिवसभर वेगवेगळे शासकीय परिपत्रके व आदेश त्यातच अनेक वेगवेगळ्या माहितीसाठी वेगवेगळ्या लिंक येतात त्यामुळे शिक्षक पूर्ण वेळ या ऑनलाईन काम व व्हाट्सअप ग्रुप मुळे मोबाईलवर व्यस्त असल्यासारखे असतात. त्यात या प्स चे सर्वर चालले नाही तर माहिती वेळेत गेली नाही म्हणून पुन्हा कारवाईची भीती असते. या तणावांमध्येच शिक्षक दिवसभर असतात या सर्व कामाचा परिणाम अध्यापनावर होतो आहे. त्यामुळे शासनाने हे सर्व प्स एकत्रित करून नवीन डिजिटल प्रणाली विकसित करावी व हवी असलेली माहिती आपोआप या पवरून वेगवेगळ्या योजनेसाठी स्वीकारली जाईल अशी काही व्यवस्था करावी जेणेकरून शिक्षकावरील या ऑनलाइन कामाचा ताण कमी होईल अशी मागणी शिक्षक मैत्री प्रतिष्ठान अंबाजोगाई च्या वतीने अध्यक्ष विजय रापतवार व त्यांच्या संपूर्ण प्रतिष्ठानच्या वतीने शासनाकडे केली आहे.

# ढेकणमोहा येथे डेंग्यू, मलेरिया, चिकनगुनिया प्रतिबंधासाठी आरोग्य जनजागृती व सर्वेक्षण

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३० ऑक्टोबर**

तालुक्यातील मौजे ढेकणमोहा येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ उल्हास गंडाळ व जिल्हा हिवताप अधिकारी श्री विजयसिंह शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा हिवताप कार्यालयामार्फत डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया या साथीच्या आजारांविषयी जनजागृती व सर्वेक्षण अभियान राबविण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश गावातील नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढविणे आणि डासजन्य रोगांवर प्रभावी नियंत्रण ठेवणे हा होता.

या प्रसंगी जिल्हा पर्यवेक्षक संजय धस यांनी उपस्थित नागरिकांना मौल्यवान आरोग्य मार्गदर्शन दिले. तसेच आरोग्य सहाय्यक पवळ, सगरे, आरोग्य कर्मचारी पठाण, शगीर, सानप, करपे, भिलारे, जाधव, मेखले, सातपुते, गव्हाणे आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान ढेकणमोहा गावात कंटेनर सर्वेक्षण करण्यात आले. दूषित पाण्याच्या कंटेनरमध्ये अबेट औषध टाकण्यात आले, तर काही कंटेनर रिकामे करण्यात आले. प्रत्येक घरात जाऊन नागरिकांना डेंग्यू, मलेरिया आणि चिकनगुनिया प्रतिबंधक उपाययोजना समजावून सांगण्यात आल्या.

नागरिकांना दर आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळण्याचे, तसेच मच्छरदाणी, लिक्विड, अगरबत्ती किंवा नैसर्गिक उपाय (उदा. लिंबाची पाने) वापरण्याचे आवाहन करण्यात आले. नाल्या नियमितपणे साफ ठेवाव्यात, पाण्याच्या हौदात व खड्ड्यांमध्ये गप्पी मासे सोडावेत, अशीही सूचना देण्यात आली.याशिवाय, सरपंच आणि ग्रामपंचायतीला तात्काळ धूर फवारणी (फॉगिंग) करण्याचे निर्देश देण्यात आले, जेणेकरून डासांची उत्पत्ती आटोक्यात येईल आणि कीटकजन्य आजारांवर नियंत्रण मिळवता येईल.या उपक्रमाद्वारे गावात स्वच्छतेचे महत्त्व आणि डासजन्य आजारांपासून बचावासाठी आवश्यक उपाययोजना याबाबत नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली.

# गजानन विद्यालय लऊळ येथे ३२ वर्षा नंतर पार पडला स्नेह मिलन मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.३० ऑक्टोबर**

तालुक्यातील गजानन विद्यालय लऊळ येथे ३२ वर्षा नंतर स्नेह मिलन मेळावा पार पडला. १९९२-९३ बॅच ला शिकवणारे जाधव सर, देशमुख सर, महाजन सर, शिंगाडे सर, संस्थेच्या अध्यक्षा राजूबाई शिंदे, शाळेचे सध्याचे मुख्याध्यापक घंटाजी सर, यांचा उपस्थितीत स्नेह मिलन मेळावा पार पडला.



स्वागत गीत अरविंद लोंढे यांनी गायले. बने चाहे दुश्मन जमाना हमारा सलामत रहे दोस्ताना हमारा या गीताचे गायन देडे सर, डावरे सर, लोटे सर, यांनी केले. तसेच ताई कविताचे गायन अशोक राठोड सर, यांनी केले तर मैत्री कविताचे गायन प्रा. लक्ष्मण गिरी यांनी केले. तसेच शेटे साहेब, डॉ.कुलकर्णी व इतर वर्गमित्र यांनी मैत्री या विषयावर आपापले मनोगत व्यक्त केले. जाधव सर, यांनी औक्षवंत व निरोगी राहण्यासाठी रोज सकाळी व्यायाम करणे आहारावर नियंत्रण ठेवणे रोज किमान किमान पाच ते सहा किलोमीटर चालणे अशा आरोग्य विषयी काही टिप्स सांगितल्या. व सर्वांची शंभरी पार व्हावी सर्वांच्या हातून विद्यार्थ्यांची, समाजाची, दीनदुबळ्यांची, सेवा घडो अशा शुभेच्छा दिल्या. व सर्वांचे आभार मानले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अँड. देडे साहेब यांनी केले.कार्यक्रमाचे नियोजन लोडे सर, अशोक राठोड, उघडे सर,यांनी केले.

# जिल्ह्यात लंपी आजारावर उपाय योजना युद्ध पातळीवर करावी-अनिल बोर्डे

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.३० ऑक्टोबर**

जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी लंपी आजाराची लागण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे पशु मालक व शेतकरी ग्राहकामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आजार नियंत्रणात आणण्यासाठी शासनाने युद्ध पातळीवर उपाय योजना व नुकसान भरपाई देण्यासाठी कारवाई करण्यात यावी अशी मागणी मा. जिल्हाधिकारी बीड, मा. तहसीलदार गेवराई, मा. पशुवैद्यकीय अधिकारी गेवराई यांच्याकडे बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष तथा अध्यक्ष श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी लंपी आजाराची लागण मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे पशु मालक व शेतकरी ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सद्यस्थितीत शेतकरी ग्राहक अतिवृष्टीने आर्थिक संकटात सापडलेला आहे. त्यावर अद्याप पर्यंत ठोस उपाय योजना झालेली नाही. जिल्ह्यात तसेच गेवराई तालुक्यात लंपी आजाराची मोठ्या प्रमाणात लागण झालेली आहे असे निदर्शनास आले आहे. लंपी आजाराने काही जनावरे दगावली असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरील आजार नियंत्रणात आणण्यासाठी ठोस उपाययोजना झालेली नाही. त्यासाठी युद्ध पातळीवर उपाययोजना करणे आवश्यक आहे. सदरील आजाराचा फैलाव मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे शेतकरी ग्राहक व पशु मात्रलकांमध्ये तीव्र नाराजी पसरलेली आहे. त्याची तात्काळ शासनाने दखल घेऊन उपाययोजना युद्ध पातळीवर करणे आवश्यक आहे. पशुमालकांना या संकटातून वाचविणे शासनाचे कर्तव्य आहे. तरी शासनाने संबंधित विभागास तात्काळ आदेश निर्गमित करावेत.

तसेच नुकसान झालेल्या पशुमालकांना व शेतकरी ग्राहकांना तात्काळ युद्ध पातळीवर उपाय योजना पंचनामे करून नुकसान भरपाई देण्यात यावी. पशु मालकांना दिलासा देण्यात यावा अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे केलेली आहे.

# संपादकीय

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# 'व्हिजन'च्या निमित्ताने अपेक्षा

भारताला २०४७ अर्थात स्वातंत्र्याच्या शताब्दीपर्यंत विकसित करण्याचा संकल्प केंद्र सरकारने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवादरम्यान केला. त्यासाठी 'विकसित भारत-२०४७' ही महत्त्वाकांक्षी योजना केंद्राने आखली आहे. यामध्ये २०२५-२६ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारने २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्राचे स्वप्न पाहिले असून, त्या अंतर्गत 'विकसित महाराष्ट्र : विकसित भारतासाठी' हे ध्येय निश्चित केले आहे. विकसित महाराष्ट्राची संकल्पना मूर्त स्वरूपात मांडण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सल्लागार समिती आणि मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समन्वय समिती स्थापन करण्यात आली आहे. माहिती आणि जनसंपर्क विभागाकडून राज्यव्यापी सर्वेक्षणाच्या माध्यमातून तयार करण्यात आलेल्या 'विकसित महाराष्ट्र २०४७' या व्हिजन डॉक्युमेंटला, तसेच त्याच्या अंमलबजावणीसाठी 'व्हिजन मॅनेजमेंट युनिट' स्थापन करण्यास नुकतीच राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. 'विकसित महाराष्ट्र-२०४७' हे एक महत्त्वाकांक्षी स्वप्न आहे, ज्यात राज्याच्या विविध क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन व मध्यमकालीन विकासाचे ठोस आराखडे दिले गेले आहेत. त्यात लोकसहभाग, सुशासन, तंत्रज्ञान, समावेशकता यांसारख्या आधुनिक संकल्पना समाविष्ट आहेत. अशा प्रकारचे, दूरदृष्टी ठेवणारे एक डॉक्युमेंट, एक संकल्पना, एक निश्चित ध्येय घेऊन काम करण्याचे नियोजन करणे ही महाराष्ट्र सरकारची मोठीच उपलब्धी मानली पाहिजे.

अशा प्रकारच्या मोठ्या व्हिजनमध्ये अंमलबजावणी, निधी व्यवस्थापन, विभागांचा सहभाग आणि नियमित देखरेख या गोष्टींचे यश देखील महत्त्वाचे असते. विकसित महाराष्ट्र २०४७ अंतर्गत राज्याचे १०० उपक्रम, १५० पेक्षा अधिक मापदंड आणि ५०० पेक्षा जास्त टप्पे या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये निश्चित केले गेले आहेत. या व्हिजनच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात येणाऱ्या व्हिजन मॅनेजमेंट युनिटमधील अन्य सदस्यांची नियुक्ती मुख्यमंत्री करणार आहेत. या युनिटद्वारे राज्यातील सर्व प्रकारची गुंतवणूक आणि विविध धोरणे ही व्हिजनच्या ध्येयाशी सुसंगत असेल याची खात्री करण्यात येईल. तसेच दर तीन महिन्यांनी प्रगती आणि मापदंडांचा आढावा घेण्यात येईल. हा दस्तऐवज राज्य शासनाने तयार केला आहे आणि त्याचा उद्देश २०४७ वर्षापर्यंत महाराष्ट्र राज्याला विकसित राज्य बनविणे हा आहे. ही व्हिजन 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय मोहिमेशी सुसंगत आहे. या दस्तऐवजात तीन टप्पे निश्चित केले गेले आहेत. त्यात अल्पकालीन टप्पा २ ऑक्टोबर २०२९ पर्यंतचा धरला आहे. तर मध्यमकालीन टप्पा १ मे २०३५ पर्यंत म्हणजेच महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या ७५ व्या वर्षानिमित्त नियोजित केला आहे. तिसरा आणि शेवटचा टप्पा दीर्घकालीन असून, तो १५ ऑगस्ट २०४७ पर्यंत, म्हणजेच भारतीय स्वातंत्र्याच्या शताब्दी वर्षापर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे. या दस्तऐवजात प्रगतिशीलता, शाश्वतता, सर्वसमावेशकता आणि सुशासन हे चार मुख्य स्तंभ सांगितले आहेत. यात शहरी व ग्रामीण भागांचा समावेश असून राज्यातील शहरी व ग्रामीण दोन्ही भागांत विकासाचा समतोल साधण्याचा प्रयत्न करण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे. अनेक क्षेत्रांमध्ये काम करण्याचा उद्देश स्पष्टपणे सांगितला असून, त्यात कृषी, उद्योग, सेवा, पर्यटन, पायाभूत सुविधा, ऊर्जा, जलव्यवस्थापन, शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान हे प्रमुख विषय आहेत. महाराष्ट्रातील नागरिकांचा सहभाग हा त्यातील एक महत्त्वाचा स्तंभ आहे. नागरिकांचे सर्वेक्षण व अभिप्राय संकलन करून त्यांच्या अपेक्षा व सूचना यांचा समावेश करण्यात आला आहे. ४ लाखांहून अधिक नागरिकांनी या सर्वेक्षणात भाग घेतला आहे, हेही विशेषच म्हटले पाहिजे. निर्णयप्रक्रियेत एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) आणि मोठ्या लार्ज लँग्वेज मॉडेल्स (एलएलएम- प्रचंड विदा (डेटा) हाताळणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान) इत्यादींचा वापर करण्याचा विचारही करण्यात आला आहे.

यातील काही गोष्टी लक्षणीय आहेत. उदाहरणार्थ, २०२९ पर्यंत राज्यातील मुलांचा शैक्षणिक सहभाग ४१ टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत वाढवणे, आणि २०४७ पर्यंत तो १०० टक्के करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. शहरी भागातील झोपडपट्टी मुक्ती, स्वच्छ आणि आपत्ती-सक्षम शहरे, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे सक्षमीकरण या गोष्टी देखील या 'व्हिजन'मध्ये पाहिल्या गेल्या आहेत. हरित ऊर्जा आणि पर्यावरण-स्नेही उपायांचा विकास करण्याचाही विचार झाला आहे. उदाहरणार्थ, २०३० पर्यंत ५२ टक्के ऊर्जा हरित स्रोतांतून निर्माण करण्याचा प्रस्ताव त्यात आहे. तसेच कौशल्य विकास, उद्योजकता, नावीन्य ही विकासाची महत्त्वाची अंगे मानून त्यांची अंमलबजावणी व जबाबदाऱ्या निश्चित करण्यासाठी विभागीय समित्या व सचिव स्तरावर गटही तयार करण्यात आले आहेत. हा दस्तऐवज (डॉक्युमेंट) राज्याच्या भविष्यकालीन धोरणांचा आधार ठरेल असा आश्वासक संकेत त्यात आहे.

या व्हिजनसाठी केलेल्या सर्वेक्षणात लाखोंनी भाग घेतल्यामुळे भविष्यातील विकासाच्या प्रक्रियेत सर्व घटकांचा समावेश असण्याचे आश्वासन आपसूकच मिळते. तंत्रज्ञानाचाही समावेश यात केलेला असल्यामुळे डिजिटलायझेशन, डेटा-आधारित धोरणे आणि स्मार्ट पायाभूत सुविधा यांचा विचार हा आधुनिक विकासासाठी महत्त्वाचा आहे. सर्वसमावेशक विकासाचा संदेश यातून दिला गेला आहे. शिक्षण, आरोग्य, महिला सशक्तीकरण, शेती यांनाही या 'व्हिजन'मध्ये स्थान मिळालेले आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७' या व्हिजन डॉक्युमेंटमध्ये कृषी, शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा अशा प्रत्येक विभागासाठी उद्देश आणि उपाययोजना दिल्या आहेत. त्यात कृषी व ग्रामीण विकास या सर्वांत महत्त्वाच्या विषयांत राज्याच्या अर्थव्यवस्थेला विकसित करण्यासाठी शेतीचे योगदान वाढवण्याचे लक्ष्य आहे. सर्व शेतकऱ्यांना वर्षभर दिवसा सौरऊर्जेने वीजपुरवठा करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी 'स्मार्ट व इंटेलिजन्ट' गावे तयार करण्याचा प्रस्ताव असून पहिल्या टप्प्यात सुमारे ३,५०० गावांचा त्यात समावेश असणार आहे. कृषी विभाग, पाणी व जलसंधारण, हवामान प्रतिसादक पद्धती या सर्वांवर लक्ष देण्यात आले आहे. यातील सर्व योजना शहरांसह संपूर्ण ग्रामीण महाराष्ट्रातही लागू होणार आहेत. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा अशा भागांनाही त्यात आपले योगदान देता येईल. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, ड्रोन किंवा सौर पंप तंत्रज्ञान वापरणे असे उपाय त्यात शेतीच्या प्रगतीसाठी प्रस्तावित आहेत. त्यासाठी पायाभूत सुविधाही प्रस्तावित केल्या असून, त्यात हवाई मार्ग, रस्ते वाहतूक, ग्रामीण इंटरनेट वाढवण्यावरही भर आहे. यात समाविष्ट केलेली विभागनिहाय उद्दिष्टे आणि उपाययोजनांमुळे राज्याच्या विकासाला स्थिर व समावेशक दिशा निश्चितपणे मिळू शकते. तथापि, अंमलबजावणी, निधीची उपलब्धता, स्थानिक सहभाग व नियमित आढावा व देखरेख या बाबींवर विशेष लक्ष आवश्यक आहे. हा दस्तऐवज लोकांसमोर येऊन पुरते चोवीस तासही झाले नाहीत तर विरोधकांची कोल्हेकुई सुरूही झाली आहे. या संकल्पनेची त्यांनी भ्रष्टाचाराचे नियोजन अशा भाषेत संभावना करण्याचा उद्योगही सुरू केला आहे. यासाठी केलेले सर्वेक्षण खरोखर लोकसहभागातून झाले आहे काय आणि त्यांचे अभिप्राय या व्हिजनमध्ये आलेले आहेत काय, याबाबत विरोधक शंका घेत आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्रिद्वय एकनाथ शिंदे व अजित पवारांच्या दूरदर्शी सरकारने हे 'व्हिजन' स्वत: पाहिले आणि महाराष्ट्रालाही दाखविले आहे. एकप्रकारे हे फार मोठे स्वप्न आहे. राज्यकर्त्यांनी या बाबत एकच गोष्ट सुनिश्चित केली पाहिजे आणि ती अशी की, या व्हिजनला सर्व स्तरांवर संस्थात्मक व्यवस्थेचे पाठबळ द्यावे आणि त्यात सतत पारदर्शकता असेल याची खातरजमा करावी. या व्हिजनसाठी निधी कसा व कुठून येईल, त्यातील वेळेचे गणित कसे पाळता येईल, यात त्यांनी लक्ष घालावे आणि ते करूनच दाखवावे. भविष्यात कोणत्याही किंतु-परंतु विना हे काम सतत चालले पाहिजे, याची व्यवस्थाही त्यांनी करावी, एवढीच अपेक्षा आहे.

## तंत्रवेध

# ॲमेझॉन नेटवर्क आऊटेजचे गंभीर संकट

**डॉ. दीपक शिकारपूर**

२१ व्या शतकाची सुरुवात होऊन आता २५ वर्षे झाली आहेत. तरीही गेल्या १५-२० वर्षांमध्ये ज्या प्रकारे बदल झाले, तितके त्याआधीच्या ५० वर्षांमध्येही झाले नव्हते, असे म्हणता येईल. कॉम्प्युटर, इंटरनेट, त्यानंतर आलेला स्मार्टफोन यांच्या जमलेल्या गूळपीठामुळे महानगरांपासून खेड्यांपर्यंत सर्वांच्याच जीवनात फरक पडला. संगणक आणि संगणकीय प्रणाली पूर्वीप्रमाणे फक्त सांगकाम्या राहिल्या नसून मानवी व्यवहार जास्त चांगल्या पद्धतीने समजून घेण्याची क्षमता त्यांना दिली जात आहे. बदलत्या तंत्रज्ञानाचे परिणाम अनेक क्षेत्रांमध्ये क्रांतिकारी परिवर्तनाने जाणवणार आहेत. आपल्या आसपासच्या डिजिटल विश्वाची सतत उत्क्रांती होत राहणार आहे. त्यामुळेच या तंत्राचे व्यावहारिक उपयोगही वाढताना दिसणार आहेत. हे एक असे युग आहे, जिथे तंत्रज्ञानाचा वापर सर्व क्षेत्रात वाढत आहे. या युगात आपल्या दैनंदिन जीवनात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. अनेक व्यवसाय आणि व्यक्ती पूर्णपणे डिजिटल तंत्रावर अवलंबून आहेत. बँकिंग, ई कॉमर्स, सोशल मीडिया, गेमिंग, स्ट्रीमिंग, उद्योगांचे क्लाऊड आधारित ऑपरेशन्स यापैकी बऱ्याच गोष्टी ऑनलाईन अवलंबून आहेत. 'रोटी, कपडा आणि मकान' नंतर इंटरनेट आणि डिजिटल उपकरणे या अत्यावश्यक गरजा बनल्या आहेत. अशा परिस्थितीत डिजिटल सेवा ठप्प झाल्यास अनेक प्रकारचा मनस्ताप आणि नुकसान होईल, हे नक्की. असेच काही तरी ऐन दिवाळीत घडले. 'ॲमेझॉन वेब सर्व्हिस आऊटेज' हे त्या संकटाचे नाव. आऊटेज म्हणजे सेवा किंवा पुरवठा तात्पुरता खंडित होणे किंवा उपलब्ध नसणे.

२० ऑक्टोबर २०२५ या दिवशी एक मोठी गोष्ट घडली. अमेरिकेतील व्हर्जिनिया भागातील एका मुख्य माहितीगृहात (डेटा सेंटर) अडचण आली. हे माहितीगृह ॲमेझॉन कंपनीच्या जागतिक जाळ्याचे (वेब सेवा) एक मोठे केंद्र आहे. या केंद्रात इंटरनेट पत्त्यांची माहिती देणारी यंत्रणा (प्रणाली) अचानक काम करेनाशी झाली. ही अडचण माहितीचा साठा ठेवणाऱ्या एका मोठ्या व्यवस्थेच्या (डेटाबेस सेवा) संपर्क खुणांपर्यंत पसरली. परिणामी लाखो सॉफ्टवेअर ॲप्स, वेबसाईट्स आणि इंटरनेट जोडणी असलेली साधने (उपकरणे) थांबली आणि त्यांचे कामकाज बंद पडले. सेवा थांबण्याचा हा काळ जवळपास १५ तास चालला. याचा परिणाम एका देशापुरता नव्हता, तर संपूर्ण जगाला जाणवला. धन व्यवहार (बँकिंग), मनोरंजनासाठीचे खेळ, वस्तूंची खरेदी-विक्री आणि सरकारी खात्यांची कामे अशा अनेक महत्त्वाच्या सेवा खोळंबल्या. आपल्या देशातही या आऊटेजचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर जाणवला. त्यामुळे ई-कॉमर्स कंपन्या आणि ॲमेझॉन, फ्लिपकार्ट, पेटीएम, रेझरपेसारख्या पेमेंट गेटवे प्लॅटफॉर्म्सच्या कामात व्यत्यय आला. बरेच भारतीय स्टार्टअप्स ॲमेझॉन क्लाऊड सेवेवर अवलंबून असल्यामुळे ग्राहक सेवा आणि व्यवहार ठप्प झाले. हा प्रसंग दिवाळीच्या दिवशीच घडल्यामुळे ऑनलाईन खरेदी, स्ट्रीमिंग आणि डिजिटल पेमेंट्सवर मोठा परिणाम झाला. अशा या नेटवर्क आऊटेजची सामान्य कारणे समजून घ्यायला हवीत. यामुळे हार्डवेअर बिघाड रूटर्स, स्विचेस, सर्व्हर किंवा डेटा केबल्समधील दोषांमुळे सेवेत अडथळा येतो. कॉन्फिगरेशन चुका, चुकीचे अपग्रेड्स, फर्मवेअर बग्ज किंवा डीएनएस सेटिंग्जमधील त्रुटी एखाद्या कंपनीची सेवा मोठ्या प्रमाणावर ठप्प करू शकतात. अशा वेळी डिनायल ऑफ सर्व्हिस (डीओएस) हल्ल्यांमुळे नेटवर्क अतिभारित होते आणि अनुपलब्ध बनते. विद्युत पुरवठ्यातील अडथळ्यांमुळे डेटा सेंटरमध्ये यूपीएस किंवा जनरेटर फेल होऊन सेवा बंद पडतात. मानवी त्रुटी, कॉन्फिगरेशन किंवा ऑटोमेशन स्क्रिप्ट्समधील चुकांमुळे मोठ्या प्रमाणावर परिणाम होऊ शकतो. म्हणूनच नेटवर्क आऊटेज टाळण्याच्या काही उपाययोजना महत्त्वाच्या ठरतात. आजच्या काळात इंटरनेट आणि नेटवर्क सेवा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनल्या आहेत. त्या अचानक थांबणे हा मोठा धोका ठरतो. त्यामुळे आर्थिक नुकसान आणि कामाची प्रचंड हानी होऊ शकते. अशा सेवा थांबण्यापासून बचाव करण्यासाठी काही सोपे उपाय सांगितले जातात. पहिला उपाय म्हणजे दुप्पट व्यवस्था (कंट्रोल्ड रिडंडन्सी) कार्यरत ठेवणे. म्हणजेच प्रत्येक सेवेची दुप्पट व्यवस्था सुनिश्चित करणे. भारतातील कुठल्याही घरी १० पाहुणे जेवायला बोलावले असल्यास गृहिणी २० लोकांचा स्वयंपाक करतात. हे तसेच आहे. दुसरा महत्त्वाचा उपाय म्हणजे नेटवर्क मार्ग कार्यरत असणे. एकाच वेळी दोन किंवा त्याहून अधिक इंटरनेट सेवा पुरवठादारांकडून (आयएसपी) जोडणी घ्यावी. आणिबाणीच्या प्रसंगी त्याचा मोठा फायदा होतो. एका कंपनीची सेवा बंद पडल्यास लगेच दुसऱ्या मार्गाने काम सुरू ठेवता येते. अन्य काही उपाय हार्डवेअर नेटवर्क यंत्रसामग्रीच्या रूपात योजता येतात. सर्व्हर, राऊटर आणि स्विच यासारखी महत्त्वाची यंत्रे अतिरिक्त संख्येने उपलब्ध ठेवावी लागतात. एक यंत्र बिघडल्यास, दुसरे आपोआप काम सुरू करते. याला फेलोवर सेफ्टी व्यवस्था म्हणतात. याच कारणासाठी वाहनात स्टेपनी टायर असतो. म्हणूनच कंपन्यांनी शक्य असल्यास माहिती साठवणारे केंद्र (डेटा सेंटर) एकाच ठिकाणी न ठेवता वेगवेगळ्या ठिकाणी ठेवली पाहिजेत. यामुळे एखाद्या ठिकाणी नैसर्गिक आपत्ती (भूकंप किंवा पूर) आल्यास, दुसऱ्या ठिकाणाहून सेवा सुरू ठेवता येते. येथे नमूद करण्याजोगी आणखी एक बाब म्हणजे सेवा घेताना आपल्या यंत्रणेची नियमित देखरेख आणि तपासणी करणेही गरजेचे आहे. नेटवर्क सेवा अखंड सुरू ठेवण्यासाठी अशी देखरेख अत्यंत आवश्यक असते. यात स्वयंचलित प्रणालींची भूमिका महत्त्वाची असते. नेटवर्कमधील प्रत्येक घटकावर सतत लक्ष ठेवणारी स्वयंचलित साधने वापरावी लागतात. यामुळे मोठी समस्या येण्यापूर्वीच लहान त्रुटी ओळखता येतात आणि लगेच दुरुस्त करता येतात. यंत्रणा अद्ययावत ठेवणेही विशेष गरजेचे ठरते. त्यासाठी यंत्रणेच्या उत्तम वापरासाठी सर्व सॉफ्टवेअर आणि उपकरणे वेळेवर अपडेट केली पाहिजेत. जुन्या तंत्रज्ञानात अनेक त्रुटी असतात, ज्यामुळे सेवा थांबण्याची शक्यता वाढते. म्हणूनच हे पाऊल महत्त्वाचे ठरते. वीज पुरवठा हा असाच एक दखलपात्र मुद्दा. नेटवर्क उपकरणांसाठी अखंड वीजपुरवठा यंत्रणा आणि जनरेटर सेवा उपलब्ध असणे अनिवार्य आहे. विजेच्या अनियमिततेमुळे किंवा सेवेत खंड झाल्यामुळे सेवा थांबणार नाही, याची काळजी घ्यावी लागते.

या टप्प्यावर आणखी काही प्रकारची काळजीही महत्त्वाची ठरते. त्यात सुरक्षितता आणि प्रशिक्षणाचा समावेश होतो. सेवा अखंड सुरू राहावी यासाठी केवळ तांत्रिक उपाय पुरेसे नाहीत; तर मानवी घटक आणि सुरक्षिततेकडेही लक्ष देणे महत्त्वाचे आहे. उदाहरणार्थ सायबर हल्ला संरक्षण. नेटवर्कवर होणारे सायबर हल्ले सेवा बंद पाडू शकतात. यासाठी मजबूत फायरवॉल आणि सुरक्षितता प्रणाली वापरावी लागतात. नेटवर्क चालवणाऱ्या कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देणेही महत्त्वाचे ठरते. त्यांना अडचणी आल्यास काय करायचे, याचे स्पष्ट नियम तयार असावेत. सेवा थांबल्यास काय करायचे, याचे आणिबाणीचे नियोजन प्रत्येक कंपनीकडे तयार असणे महत्त्वाचे ठरते. कर्मचाऱ्यांनी या नियोजनानुसार वेळोवेळी सराव करणे गरजेचे आहे. ताज्या ॲमेझॉन नेटवर्क आऊटेजने हे सिद्ध केले की, डिजिटल अर्थव्यवस्थेत स्थैर्य राखण्यासाठी फक्त एका तंत्रज्ञान पुरवठादारावर अवलंबून राहणे घातक ठरू शकते. भविष्यातील सुरक्षेसाठी कंपन्यांनी विविध क्लाऊड पुरवठादार, डेटा सेंटर क्षेत्रे आणि डीएनएस व्यवस्थापन वापरून स्वतःची डिजिटल संगणक व्यवस्था अधिक सशक्त, सक्षम ठेवणे हेच खरे शहाणपण ठरेल.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# पाणी समस्येवर तोडगा निघावा

मे महिन्यापासून सुरू असलेला पाऊस दिवाळी आटोपून देखील पाठ सोडायला तयार नाही. यावर्षी सततच्या पावसामुळे शेती आणि शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक ठिकाणी तर विदारक परिस्थिती ओढवली. असे असले तरी जलसाठ्यांमध्ये मुबलक असलेले पाणी वर्षभराची चिंता मिटविणारे आहे. पिण्याच्या पाण्यासह सिंचनासाठी उपयोगी असलेले जलसाठे सद्य:स्थितीत तुडुंब आहेत. २५ ऑक्टोबरपर्यंत अकोला जिल्ह्यात ७५१.३ मिमी अर्थात सरासरीच्या तुलनेत १०१.७ टक्के पावसाची नोंद करण्यात आली. पण एकीकडे निसर्गाने इतके मुबलक दान दिल्यावरही दुसरीकडे सर्वसामान्यांची पिण्याच्या पाण्याची समस्या कायमच आहे. अकोला शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पात १०० टक्के जलसाठा असूनही शहराला चार दिवसाआड तर ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये तब्बल १५-२० दिवसांनंतर पाणीपुरवठा करण्यात येत आहे. ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यातील ही परिस्थिती फेब्रुवारीनंतर अधिकच बिकट होते आणि मग साठवलेल्या पाण्याचे 'मूल्य' इतके वाढते की, ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये घराघरात पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांना कुलूप देखील लावलेले आढळते. नदीकाठी असणाऱ्या काही गावांमध्ये तर कोरड्या नदी पात्रात खड्डा (झिरा) करून त्यातून मिळालेले पाणी वापरले जाते. ही सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर दरवर्षी अकोला जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचे हे दुर्भिक्ष संपेल तरी कधी असा प्रश्न उपस्थित होतो आणि अनुत्तरितच राहतो.



माणसाच्या जगण्यासाठीच्या मूलभूत गरजांपैकी पिण्याचे पाणी ही अत्यावश्यक असलेली गरज आहे. केंद्र शासनाच्या निकषांनुसार ग्रामीण भागात पिण्यासाठी आणि घरगुती वापरासाठी प्रति व्यक्ती, प्रति दिवस किमान ४० लिटर पाणी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तर शहरी भागात प्रति व्यक्ती, प्रति दिवस १३५ लिटर पाणीपुरवठा करण्यात यावा, असे सुचविण्यात आले आहे. मात्र, हे निकष अकोला जिल्ह्यात अद्याप पूर्ण होत असल्याचे कुठलेच चिन्ह नाही. अकोला जिल्ह्यात बार्शिटाकळी तालुक्यात महान येथे असलेला काटेपूर्णा, तेल्हारा तालुक्यातील वान येथे असलेला हनुमान सागर हे दोन मोठे, तर दगडपारवा, मोर्णा, निर्गुणा, उमा हे मध्यम प्रकल्प आहेत. यासह २४ लघु प्रकल्प देखील आहेत. पण असे असताना देखील पिण्याच्या पाण्याची चणचण नेहमीच भासते आणि म्हणूनच दरवर्षी पाणीटंचाई आराखडा तयार करण्यात येतो. या पाणीटंचाई आराखड्यातील गावांच्या संख्येकडे पाहिल्यास जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येची भयावहता समोर येते. गतवर्षीच्या या आराखड्यात जिल्ह्यातील २८७ गावांचा समावेश होता. अकोल्यातील पाणीटंचाईची झळ जानेवारीपासून सुरू होते. म्हणूनच पाणीटंचाई आराखडा देखील दोन टप्प्यांत करण्यात येतो. यात जानेवारी ते मार्च आणि एप्रिल ते जून अशी योजना करण्यात येते. गतवर्षी देखील या टंचाई आराखड्यावर तब्बल ५ कोटी ५३ लाख २२ हजार रुपये खर्च करण्यात आले. अनेक वर्षांपासून शासन हा खर्च करून तात्पुरती मलमपट्टी करण्यात येते. पण पाणीटंचाईच्या समस्येच्या समाधानाकरिता मलमपट्टीची नव्हे तर कायमस्वरूपी उपचाराची गरज आहे आणि ती पूर्ण कधी होईल याची सामान्यजणांना प्रतीक्षा देखील आहे. खरं म्हणजे ही समस्या अकोला जिल्ह्याची तर आहेच. पण अशाच प्रकारच्या समस्येला राज्यातील अनेक तालुके तोंड देत आहेत. पण गत ७० वर्षांत या समस्येच्या सोडवणुकीसाठी गांभीर्याने पुढाकार घेतला गेला नाही. आता 'वैनगंगा ते नळगंगा' नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्यासह सिंचनाची समस्या संपावी म्हणून महायुती सराकारने पुढाकार घेतला आहे. ही सकारात्मक बाब आहे. पण दुष्काळी योजनांची तजवीज प्रशासनिक स्तरावर सुरू झाली की, या कामांमध्ये नैपुण्य मिळविलेल्या अनेकांची वर्दळ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये वाढते आणि मग प्रशासन आणि विशिष्ट काही जण 'दुष्काळ' दूर करण्यासाठी कामाला लागतात. सरकारने अशा सर्वांची वेळीच योग्य दखल घ्यावी, एवढेच.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# विधानसभा निवडणूक न लढणारे मुख्यमंत्री

**श्यामकांत जहागीरदार**

बिहार विधानसभा निवडणुकीत महाआघाडीने तेजस्वी यादव यांना आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर केले आहे. रालोआने मात्र अधिकृतपणे आपल्या मुख्यमंत्रिपदाच्या उमेदवाराची घोषणा केली नाही. रालोआ मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वात विधानसभेची निवडणूक लढवत असल्याचे भाजपाने जाहीर केले आहे. पण गंमत म्हणजे नितीशकुमार यावेळीही विधानसभेची निवडणूक लढवत नाही. भाजपाने नितीशकुमार हेच रालोआचे मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार आहेत, असे स्पष्टपणे म्हटले नाही. जदयुचे नेते मात्र निवडणुकीनंतरही नितीशकुमार हेच मुख्यमंत्री राहतील, असे वारंवार म्हणत आहेत. महाआघाडीतील नेते रालोआने आपला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करावा, असे आव्हान देत असताना रालोआचा घटक पक्ष असलेल्या लोजपा रामविलासचे नेते चिराग पासवान यांनी विद्यमान मुख्यमंत्री नितीशकुमार हेच रालोआचे निवडणुकीनंतर मुख्यमंत्री असतील, असे म्हटले आहे. चिराग पासवान यांच्या या विधानाला भाजपाचा पाठिंबा आहे की नाही, ते अद्याप स्पष्ट झाले नाही.

नितीशकुमार गेल्या २० वर्षांपासून म्हणजे तब्बल २००५ पासून जितनराम मांझी यांचा मधल्या काळातील नऊ महिन्यांचा अपवाद वगळता बिहारचे मुख्यमंत्री आहेत. नितीशकुमार यांचा मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ हा जवळपास २० वर्षांचा असला, तरी देशात सर्वाधिक म्हणजे नऊ वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेत त्यांनी इतिहास घडवला आहे. बिहारचे मुख्यमंत्रिपद सर्वाधिक काळ भूषविणारे राज्याचे पहिले मुख्यमंत्री श्रीकृष्णसिंह यांचा विक्रम नितीशकुमार यांनी मोडला आहे.

खरं म्हणजे नितीशकुमार बिहारमधील कुर्मी या अतिमागास समाजाचे नेते आहेत. बिहारमध्ये कुर्मी फक्त ३ टक्के आहेत. पण आपल्या या ३ टक्के मतांत अन्य अति पिछडा जातीची भर घालत नितीशकुमार बिहारमध्ये गेल्या २० वर्षांपासून सत्तेचा केंद्रबिंदू झाले आहे. राज्यातील कोणत्याच पक्षाला मग तो भाजपा असो की राजद, नितीशकुमार यांचा पाठिंबा घेतल्याशिवाय सत्तेवर येता येत नाही. सत्तेच्या राजकारणासाठी नितीशकुमार यांनी अनेक वेळा कोलांटउड्या मारल्यामुळे त्यांचा उल्लेख पलटूराम असा केला जातो. त्याचा त्यांच्या लोकप्रियतेवर फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे नितीशकुमार यांच्यावर २० वर्षे मुख्यमंत्री असतानाही भ्रष्टाचाराचा तसेच घराणेशाहीचा आरोप कधी झाला नाही. ही नितीशकुमार यांची सर्वांत मोठी उपलब्धी म्हटली पाहिजे. या बाबतीत नितीशकुमार यांची वाटचाल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारखी राहिली आहे. गुजरातचे १३ वर्षे मुख्यमंत्री आणि ११ वर्षे देशाचे पंतप्रधान असतानाही मोदी यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झाला नाही.



मोदींना कुटुंब नाही, मात्र नितीशकुमार यांचे लग्न झाले असताना तसेच त्यांना मोठा मुलगा असताना त्यांनी त्याला आपला वारस म्हणून राजकारणात आणले नाही. लालूप्रसादांनी आणलेल्या जंगलराजमधून नितीशकुमार यांनी बिहारच्या जनतेची सुटका केली, ही त्यांची मुख्यमंत्री म्हणून आणखी एक मोठी उपलब्धी आहे. या आणि आधीच्या दोन उपलब्धींमुळे बिहारच्या जनतेने त्यांच्या वारंवार पक्षाबदलासारख्या काही राजकीय निर्णयांकडे दुर्लक्ष केले, त्यांना माफ केले, असे म्हणावे लागेल. जवळपास २० वर्षे बिहारचे मुख्यमंत्रिपद भूषवत असताना नितीशकुमार यांनी गेल्या ३५ वर्षांत विधानसभेची निवडणूक लढवली नाही. विधान परिषदेचे सदस्य म्हणून ते मुख्यमंत्रिपद भूषवत आहेत. विधानसभा निवडणूक न लढवणे आणि मागल्या दाराने म्हणजे विधान परिषदेतून सत्तेवर येणे ही नितीशकुमार यांची राजकीय कमजोरी मानली जाते. या मुद्यावरून त्यांच्यावर आरोपही होतात. नालंदाच्या हरनौल विधानसभा मतदारसंघातून नितीशकुमार यांनी १९७७ मध्ये पहिल्यांदा विधानसभा निवडणूक लढवली, पण त्यात त्यांचा पराभव झाला. १९८५ मध्ये दुसऱ्यांदा त्यांनी या मतदारसंघातून निवडणूक लढवली आणि जिंकली. त्यानंतर आजपर्यंत नितीशकुमार यांनी एकदाही विधानसभेची निवडणूक लढवली नाही. १९८५ मध्ये त्यांनी लढवलेली विधानसभा निवडणूक ही त्यांची शेवटची विधानसभा निवडणूक होती.

लोकांमधून निवडणूक लढवत जिंकून यायला नितीशकुमार घाबरतात, असे म्हणावे तर त्यांनी आतापर्यंत सहा वेळा लोकसभेच्या निवडणुका लढवल्या आणि जिंकल्याही. १९८९, १९९१, १९९६, १९९८, १९९९ आणि २००४ अशा सलग सहा लोकसभा निवडणुका नितीशकुमार यांनी लढवल्या आणि जिंकल्या.

२००० मध्ये नितीशकुमार यांनी पहिल्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, तेव्हा ते कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. मात्र, बहुमताअभावी ८ दिवसांतच त्यांना राजीनामा द्यावा लागल्यामुळे पुढचा प्रश्न उद्‌भवला नाही. नोव्हेंबर २००५ मध्ये नितीशकुमार यांनी दुसऱ्यांदा बिहारचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली, तेव्हाही ते कोणत्याही सभागृहाचे सदस्य नव्हते. मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडून यावे लागत असल्यामुळे नितीशकुमार २००६ मध्ये पहिल्यांदा विधान परिषदेवर निवडून आले. विधान परिषदेचा त्यांचा पहिला कार्यकाळ २०१२ मध्ये संपला. २०१० मध्ये पहिल्यांदा नितीशकुमार यांनी आमदार असताना मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. २०१२ मध्ये मुख्यमंत्री असताना दुसऱ्यांदा ते विधान परिषदेवर निवडून आले.

२०१५ मध्ये बिहार विधानसभेची निवडणूक झाली तेव्हा मुख्यमंत्री असलेल्या नितीशकुमार यांनी विधानसभेची निवडणूक लढण्यास नकार दिला. एकाच म्हणजे मी लढवत असलेल्या विधानसभा मतदारसंघात लक्ष केंद्रित करण्याऐवजी संपूर्ण राज्यावर लक्ष केंद्रित करण्यासाठी मी विधानसभा निवडणूक लढवत नसल्याचे त्यांनी सांगितले. २०१८ मध्ये नितीशकुमार यांचा विधान परिषद सदस्य म्हणून दुसरा कार्यकाळ संपला आणि ते तिसऱ्यांदा परिषदेवर निवडून आले. विधान परिषद सदस्य म्हणून त्यांचा तिसरा कार्यकाळ २०२४ मध्ये संपला. २०२४ मध्ये ते चौथ्यांदा विधान परिषदेवर निवडून आले. आता त्यांचा चौथा कार्यकाळ २०३० मध्ये संपत आहे. त्यामुळे यावेळी ते विधानसभेच्या निवडणूक रिंगणात नाही.

जनतेतून निवडणूक लढवायला नितीशकुमार घाबरतात, असा आरोप विरोधक त्यांच्यावर सातत्याने करतात. पण या आरोपाचे ते खंडन करतात. माझ्या मर्जीने विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय मी घेतला आहे, ही माझी राजकीय मजबुरी नाही, असे ते म्हणतात. बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी नितीशकुमार यांना बिहारमधील कोणत्याही विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचे आव्हान दिले, त्या मतदारसंघात मी तुमच्याविरुद्ध उभा राहतो, असे आव्हान दिले, पण ते आव्हान नितीशकुमार स्वीकारू शकले नाहीत. देशात सर्वाधिक म्हणजे नऊ वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रम जसा नितीशकुमार यांच्या नावावर आहे, तसाच विधानसभेची निवडणूक न लढवता २० वर्षे मुख्यमंत्रिपद भूषविण्याचा विक्रमही त्यांच्या नावावर आहे. यावेळी नितीशकुमार मुख्यमंत्री झाले तर १० वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर नोंदला जाणार आहे.

९८८१७१७८१७

## शून्य पटसंख्या असलेल्या शाळा व शिक्षक

पश्चिम बंगाल आणि तेलंगणा या राज्यात शून्य पटसंख्या असलेल्या शाळांची वृत्तपत्रात आलेली कथा आहे, २०२४-२०२५ मध्ये या शाळांमध्ये एकही ॲडमिशन झालेलं नाही आणि शिक्षक मात्र २०,००० च्या पुढे नियुक्त आहेत. शाळेत मुलं नाहीत, शाळेला शिक्षक आहे, शिक्षकाला पगार आहे अशा पश्चिम बंगालमध्ये ३८१२ शाळा तर तेलंगणामध्ये २२४५ शाळा शून्य पटसंख्येच्या आहेत यावर नक्कीच विचार करावासा वाटतो. महाराष्ट्रात तर बरेचसे जिल्हे शैक्षणिक उच्च स्तरावर आहेत. शक्यतो महाराष्ट्रात बिन पटाची कुठेही शाळा नाही, कुठेही बिन पटाचे शिक्षक नाही, सर्व शाळा उच्च स्तरावर १०० टक्के शिक्षित आहेत, तसेच म्हणजे एक दोन पटसंख्या असलेल्या शाळेमध्ये तेथील शिक्षक शाळेतील पटसंख्या कशी वाढेल हेही पाहत असतात. जातो यामध्ये नक्कीच कुठेतरी काळेबेरे होऊ शकते हे कोणाला सांगायची गरज नाही. नक्कीच अशा शाळांवर केंद्रीय स्तरावरच्या मंत्र्यांनी लक्ष देणे गरजेचे आहे. कारण तेलंगणा आणि पश्चिम बंगाल जर लक्ष देत नसेल तर तेथे लक्ष देणे केंद्र सरकारचे काम आहे.

**शिरीष बने**/९२२४२९९२३०

## वाचक पत्रे

गिफ्टिंग हे एकीकडे आनंद देणारं असतं तर दुसरीकडे पसाऱ्याला आमंत्रण देणारं सुद्धा असतं. उपयोगी वस्तू मिळाली तर बरं वाटतं. परंतु अनेकदा असं होतं की गरजेच्या नसणाऱ्या वस्तू मिळतात आणि त्या देणाऱ्यांची आठवण सुद्धा करून देणाऱ्या असतात. त्यामुळे कधीतरी वापरू म्हणून माळ्यावर किंवा दिवाणाच्या बॉक्समध्ये ठेवल्या जातात किंवा इतर कुणाला दिल्या जातात. नुसतं दिवाळीला असं होतं का ? नाही. हे प्रत्येक सणाला, वाढदिवसाला, घरातील लग्नकार्यात किंवा मोठ्या कार्यक्रमात असं होतं. ज्या घरांमध्ये सुबत्ता नांदत असेल तिथे तर अक्षरशः या सर्वांची गरज नसते. परंतु रीत म्हणून बऱ्याच वेळा भेटवस्तू दिल्या जातात. अशा प्रकारे गिफ्ट आणि रिटर्न गिफ्टचा सिलसिला सुरू राहतो. त्याचा आनंदही भरपूर मिळतो परंतु तो क्षणिक ठरतो. त्यामुळे विचार करूनच भेटवस्तू द्यावी अथवा आर्थिक भेटवस्तू योग्य स्वरूपात देणे कधीही उत्तम.

## आजचे संघगीत-२७

गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५

### कालगतीहुनि बलवत्तर ही पौरुषशाली मने

कालगतीहुनि बलवत्तर ही पौरुषशाली मने
याच मनांच्या अमित बलावर लाख झुंजवू रणे ॥धृ.॥

शिवशक्तीचे पूजक होउनि वीरव्रत हे अंगिकारुनी
एकच पूजन आम्हा माहिती शिरकमले अर्पिणे ॥१॥

घरि वा दारी वा देशांतरि जे जे खुपते शल्य अंतरी
दूर करू ते सत्वर करुनी भीषण समरांगणे ॥२॥

भरतभूमिचे सुपुत्र आम्ही देह वाहिला तिच्याकारणी

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# जिल्ह्यातील अवैध धंदे बंद करण्याची भारतीय जनता पक्षाची मागणी

## जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षकांना दिले निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० आक्टोबर**

हिंगोली शहरासह जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा, मटका, जुगार तसेच इतर अवैध धंदे बंद करण्याची मागणी भारतीय जनता पक्षाच्यावतीने दि ३० आक्टोबर रोजी जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

मागील अनेक दिवसांपासून हिंगोली शहरासह जिल्ह्यात मटका, जुगार अड्डे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत तसेच अवैध दारू विक्री, अवैध गुटखा विक्रीही होत आहे. वाळू माफीया जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात फोफावला असून वाळू माफीयांना कोणाचीही भिती राहीली नाही. जिल्ह्यातील पूर्णा, कयाधू तसेच इतर नद्यांवरील वाळू घाटावरून मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा सर्रास होत आहे. महसुलच्या पथकांवर अनेकवेळा वाळू माफीयांनी जीवघेणा हल्ला केला आहे. एका टिप्परचे २५ ते ३० हजार रूपये प्रमाणे विक्री करीत आहेत. त्यामुळे कमी कालावधीत वाळू माफीया धनदांडगा होत आहे तर सर्वसामान्य लोकांना बांधकामांसाठी वाळू मिळत नसल्यामुळे नाईलाजास्तव वाळू माफीयांना विन-वणी करून वाळू विकत घ्यावी लागत आहे. शासनाचे वाळू डेपो धूळखात पडले आहेत. वाळू घाटाचे लिलाव अनेकवेळा वाळू माफीयांमुळे रद्द होत असल्यामुळे जिल्ह्यात सर्वसामान्य नागरिकांना बांधकामासाठी वाळू मिळत नाही.

दुसरीकडे महसूल विभागाचे पथक असूनही सर्रास वाळू माफीया अवैधपणे वाळू उपसा करून नदीप-त्रातील वाळू मोठ्या प्रमाणावर उपसत आहेत. या वाळू माफीयांना राजकीय संरक्षण मिळत असल्यामुळे त्यांचे काहीच वाकडे होत नाही अशा रूबाबात ते वावरत आहेत.

जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागात अवैध दारू विक्री, मटका, जुगाराचे जाळे खोलवर पस-रले असून अनेकांचे संसार उध्वस्त होत आ-हेत. यासर्व अवैध धंद्यांमुळे जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून याकडे पोलिस प्रशासन आणि महसूल प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालावे अन्यथा भारतीय जनता पक्षाच्यावतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी भाजपचे युवा नेते शिवाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, रजनीश पुरोहीत, गुड्डु देवकते, रजनी पाटील, पवन उपाध्याय, क्रिश्ना रूहीटीया, अमित रूहीटीया, सुनिता मुळे, वंदना गायकवाड, महेश शहाणे, विजय धाकतोडे, उमेश गुठ्ठे, आशिष जैस्वाल, नायक, माणिक लोडे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जलयुक्त शिवारची कामे कालमर्यादेत पूर्ण करा- राहुल गुप्ता

## कृषी विभागाच्या विविध योजनांचा घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० आक्टोबर**

जलयुक्त शिवार'ची कामे विहित कालमर्यादेत पूर्ण करावीत अन्यथा संबंधित अधिकाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज आयोजित बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जलयुक्त शिवार २.०, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार अभियानाच्या कामाचा आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा मृद व जल संधारण अधिकारी अनिल कांबळे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, वन विभाग, तालुका कृषि अधिकारी, पूर्णा पाटबंधारे, जिल्हा परिषद लघुसिंचन तसेच विविध विभागाचे अधिकारी तसेच जयाजी पाईकराव उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी जलयुक्त शिवार अभियानांतर्गत प्रस्तावित गाव आराखड्यानुसार राबविण्यात येणाऱ्या लघु पाटबंधारे तलाव दुरुस्ती, गाळ काढणे, वनतळे, खोल सलग समतल चर, मातीनाला बांध, अनघड दगडी बांधकाम, गॅबीयन बंधारा, सिमेंट नाला बांध, रोपवन, वृक्ष लागवड, रस्ता दुतर्फा वृक्ष लागवड, नाला खोलीकरण, पाझरतलाव दुरुस्ती, केटीवेअर, शेततळे, रिचार्ज शॉफ्ट आदी कामाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. तसेच त्यांनी विभागनिहाय दिलेले उद्दिष्ट, झालेले काम, प्रगतीपथावरील कामे तातडीने पूर्ण करुन त्याचा अहवाल सादर करावा, असे सांगून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत राबविण्यात येत असलेल्या कामाचाही आढावा घेतला.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी घेतला कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी कृषी विभागाच्या विविध योजनेचा आढावा घेतला. यावेळी कृषी समृध्दी योजनेतून जिल्हास्तरीय नाविण्यपूर्ण प्रकल्प उभारण्यासाठी हवामान बदलास अनुकूल पीक पद्धती मॉडेल, बायोपचार उत्पादन युनिट, मूरघास उत्पादन युनिट, हळद मूल्यवृद्धीसाठी शीतगृह, जलतारा, जैवकुंपण, करवंद लागवड, केळी निर्यात प्रकल्प उभारण्याबाबत आढावा घेण्यात आला.

तसेच प्रधानमंत्री पिक विम्याचे दावे अंतिम करुन पिकविम्याची रक्कम वाटप करण्याची कार्यवाही १५ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करावी अन्यथा पीक विमा कंपनी व संबंधितावर कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, तोंडापूर कृषि विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी, जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी अतुल वायसे, पशुसंवर्धन विभागाचे प्रतिनिधी, उपविभागीय कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, सर्व तालुका कृषी अधिकारी उपस्थित होते.

# चौपदरीकरणासाठी २५१ कोटी निधी मंजुर, भाजपचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० आक्टोबर**



नर्सी फाटा, अग्रसेन चौक ते सावरखेडा या राष्ट्रीय महामार्गापर्यंत रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी तसेच कयाधू नदीवरील पूल व रेल्वे उड्डाणपूल यासाठी आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या पाठपूराव्यामुळे केंद्रीय परिवलन मंत्री नितीन गडकरी यांनी २५१ कोटी रूपयांचा निधी मंजूर केला आहे. निधी मंजूर झाल्यामुळे भारतीय जनता पक्षाच्यावतीने जल्लोष साजरा करण्यात आला.

येथील गांधी चौकात भाजपचे जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, युवा नेते शिवाजीराव मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या नेतृत्वात दि २९ आक्टोबर रोजी फटाक्यांची आतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी मागील अनेक दिवसांपासून शहरात नर्सी फाटा ते अग्रसेन चौक ते सावरखेडा या राष्ट्रीय महामार्गापर्यंत रस्त्याचे चौपदरीकरण व्हावे यासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निधीसाठी पाठपुरावा केला होता. या मागणीला यश आले असून चौपदरीकरणासाठी, पूलाच्या बांधकामांसाठी २५१ कोटी निधी मंजूर झाला आहे. कयाधू नदी पूल आणि रेल्वे उड्डाणपूल अरूंद असल्यामुळे या ठिकाणी नेहमीच वाहतुकीची कोंडी होत असल्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. याची गंभीर दखल घेत आ. मुटकुळे यांनी ही मागणी लावून धरली होती.

यावेळी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, शशीकांत वडकुते, शाम खंडेलवाल, संजय ढोके, प्रशांत सोनी, माणिक लोडे, राजेश गोटे, ईश्वर उरेवार, उत्तमराव जगताप, भाऊराव ठाकरे, अमित रूहीटीया आदींची उपस्थिती होती.




**हिंगोली- शहरासह जिल्ह्यात सुरू असलेले अवैध धंदे बंद करण्याची मागणी भारतीय जनता पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. यावेळी युवा नेते शिवाजी मुटकुळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, रजनी पाटील, गुड्डु देवकते, क्रिश्ना रूहीटीया, सुनीता मुळे, वंदना गायकवाड, इमडे, माणिक लोडे, रजनीश पुरोहीत, पवन उपाध्याय आदी. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### बँकांनी उद्दीष्ट वेळेत पूर्ण करावेत- जिल्हाधिकारी

हिंगोली-जिल्ह्यातील सर्व बँकांनी विविध योजनांमध्ये देण्यात आलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्ह्यातील सर्व बँकांचे शाखा व्यवस्थापक व जिल्हा प्रतिनिधी यांची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, जिल्हा उद्योग केंद्राचे प्रतिनिधी, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रमुख जिल्हा व्यवस्थापक सुजित झोडगे व सर्व बँकेचे जिल्हा समन्वयक बैठकीला उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी गुप्ता म्हणाले, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना, प्रधानमंत्री स्वनिधी, मुख्यमंत्री रोजग-ार निर्मिती कार्यक्रम योजना, प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना, अटल पेन्शन योजना, जीवन ज्योती विमा योजना, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभागाच्या योजना, किसान क्रेडिट कार्ड, बचतगटांची कर्ज प्रकरणे आदी विविध योजनांसाठी देण्यात आ-लेले ५० टक्के उद्दिष्ट दि. ४ नोव्हेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण करावेत. तसेच रब्बी पीक कर्जाचे वितरण वेळेत करुन उद्दिष्ट पूर्ण करावेत, असे निर्देशही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिले.

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण



हिंगोली- वसमत तालुक्यातील जूनूना येथील राहुल नारायण गवळी खून प्रकरणातील फिर्यादी, साक्षीदार व त्यांच्या कुटुंबातील सदस्य यांच्यावर खोटे गुन्हे दाखल करून दबाव आणून त्यांना न्यायालयात साक्ष देण्यापासून रोखण्याचा प्रयत्न संबंधितांकडून होत आहे. याप्रकरणी न्याय मिळावा तसेच दोषींवर कारवाई करावी या मागणीसाठी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले आहे. यामध्ये विशाल पाटील, यशवंत गवळी, ज्ञानेश्वर नाईक, करण वाळके, विठ्ठल नाईक, देविदास माहोरे यांचा समावेश आहे.


### पूर येथील ग्रामस्थांचे महावितरणला निवेदन


हिंगोली- औंढा नागनाथ तालुक्यातील पूर येथील गावातील शाळेवरून गेलेली विजेची तार तत्काळ काढण्यात यावी. अन्यथा विद्यार्थ्यांच्या जीवीत्वास धोका निर्माण झाला आहे. तसेच गा-वात गावठाण डीपी २५ के व्ही ऐवजी १०० के व्ही देण्यात यावा आणि गावातील वीज पुरवठा सुरळीत करावा. वारंवार अभियंता आणि लाईनमन यांच्याकडे मागणी करूनही मागील अनेक वर्षापासून याकडे दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे पुर येथील ग्रामस्थांनी हिंगोली येथील अधीक्षक अभियंता यांच्या दालनात भेट घेत मागण्यांचे निवेदन सादर केले.

# औंढा नागनाथ पंचायत समिती वाऱ्यावर, अनेक कर्मचारी कामाच्या वेळेत सतत गैरहजर, भाजप तालुका उपाध्यक्ष संतोष जाधव यांनी गेटला ठोकले टाळे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० आक्टोबर**







गेल्या काही दिवसापासून औंढा पंचायत समितीला मरगळ आली असून पंचायत समितीमध्ये अनेक अधिकारी व कर्मचारी उप-स्थित राहत नसल्यामुळे तसेच कार्यालयीन वेळेमध्ये उशिरा येत असल्याने नागरिकांची बरीच कामे खोळंबली आहेत. याकडे वरिष्ठांनी लक्ष देऊन अधिकारी व कर्मचारी यांना शिस्त लावणे गरजेचे झाले आहे. पंचायत समिती मधील आस्थापना विभाग, रोजगार हमी विभाग, पशु विभाग, घरकुल विभाग, कृषी विभाग, जलजीवन संपूर्ण स्वच्छता अभियान विभाग, लेखा विभाग, समाज कल्याण विभाग, बांधकाम विभाग या विभागामधील अनेक कर्मचारी कामाच्या वेळेत हजर नसतात. त्यामुळे नागरिकांची कामे कोण करणार असा प्रश्न निर्माण होत आहे. तसेच औंढा नागनाथ पंचायत समिती मधील कर्मचारी कार्यालयीन वेळेमध्ये व नेहमीच गैरहजर असतात .जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रत्यक्ष पंचायत समितीला अचानक भेट देऊन त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्याची मागणी जवळाबाजार मंडळ भाजपा तालुका उपाध्यक्ष संतोष जाधव व नागरिकांतून होत आहे.

पंचायत समितीचे गटविकास अधिकारी वेळेवर येत नाहीत. दिवाळी पासून तर ते कार्यालयामध्ये अद्याप आलेच नाहीत. आले तर ते काही तासांकरिता पंचायत समितीमध्ये येत असतात. त्यामुळे अनेक घरकुल, विहिरी, गोठा योजनेतील लाभार्थ्यांची कामे खोळंबली आहेत. त्यामुळे औंढा पंचायत समितीमधील अनेक कर्मचारी कामचुकारपणा करीत असल्याचे दिसून येत आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील जवळाबाजार मंडळ तालुका उपाध्यक्ष संतोष नामदेव जाधव यांनी गुरुवारी (ता.३०) रोजी सकाळी साडे अकराच्या दरम्यान औंढा पंचायत समिती गेट लावून कर्मचाऱ्यास पंचायत समिती कार्यालयास जाऊ दिले नाही. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये चांगलीच तारांबळ उडाली होती.तुम्ही उशिरा का येता याचा जाब विच-ारला असता कर्मचाऱ्यांनी काहीच उत्तर दिले नाही.

वरिष्ठांनी अचानक पंचायत समितीला भेट देऊन गैरहजर व कामचुकार कर्मचाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी जवळाबाजार मंडळ भाजपा तालुका उपाध्यक्ष संतोष नामदेव जाधव व नागरिक करीत आहेत. सर्वसामान्य नागरिकांना एका कामासाठी पंचायत समितीला पाच ते सहा वेळा चकरा माराव्या लागत आहेत. तरीही त्यांची कामे वेळेवर होत नाही .कर्मचाऱ्यावर येत्या काळामध्ये वचक राहिली नाही का? मुख्य कार्यकारी अधिकारी याकडे लक्ष देऊन कर्मचाऱ्यावर कारवाई करतील का अशी चर्चा होत आहे.

पंचायत समिती मधील कर्मचारी वेळेवर येत नसल्याने कार्यालयाचे गेट लावले. यापुढे कर्मचारी वेळेवर आले नाही तर थेट पंचायत समितीला कुलूप लावेल असा इशारा भाजपचे तालुका उपाध्यक्ष संतोष जाधव यांनी दिला आहे.

# अमृत दुर्गोत्सव २०२५- छत्रपती शिवरायांना अनोखी मानवंदना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० आक्टोबर**

राज्य शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या स्वायत्त संस्थेमार्फत अमृत दुर्गोत्सव २०२५या राज्यभर साजरा करण्यात येत आहे.

या उपक्रमाचा उद्देश म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या गड-दुर्गांच्या गौरवशाली इतिहासाचे स्मरण करून तो वारसा जनतेपर्यंत पोहोचविणे हा आहे.

या अभिनव उपक्रमाअंतर्गत नागरिकांना आपल्या घराच्या अंगणात, गॅलरीत किंवा सोसायटी परिसरात रायगड, राजगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग, शिवनेरी, पन्हाळगड, लोहगड, पद्मदुर्ग, जिंजी, साल्हेर, विजयदुर्ग व खांदेरी या शिवकालीन १२ दुर्गांपैकी कोणताही एक दुर्ग साकारण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तयार झालेल्या दुर्गासोबत सेल्फी काढून ती ु.वींॲर्सीरीं.ले या संकेतस्थळावर अपलोड करायची आहे. प्रत्येक सहभागीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अभिनंदन पत्र देण्यात येणार असून, हा उपक्रम पूर्णपणे लोकसहभागातून राबविण्यात येत आहे.

ही स्पर्धा नसून आपल्या संस्कृती, परंपरा आणि स्वाभिमान साजरा करण्याची संधी आहे. प्रत्येक घराघरात गड-दुर्ग उभे राहावेत, हाच या उपक्रमामागचा हेतू आहे. या माध्यमातून राज्यभरातील नागरिकांमध्ये शिवचरित्राबद्दल आदर, प्रेरणा आणि अभिमान वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या माध्यमातून राज्यातील सर्व नागरिकांनी अमृत दुर्गोत्सव २०२५या अनोख्या उपक्रमात उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन शौर्य, पराक्रम आणि इतिहासाचा अभिमान साजरा करावा, असे आवाहन अमृतचे संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

# केळी पिकांची नुकसान भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३० आक्टोबर**



कळमनुरी तालुक्यातील डोंगरकडा मंडळातील शेतकऱ्यांचे सन २०२४-२५ यावर्षात वादळी वाऱ्यामुळे केळी पिकांचे आतोनात नुकसान झाले परंतु पीक विमा उतरूनही पिकांची नुकसान भरपाई मिळाली नाही. नुकसानग्रस्त विमाधारक शेतकऱ्यांना कंपनीकडून नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

डोंगरकडा भागातील विमाधारक शेतकऱ्यांनी केळी पिकांचा पीकविमा काढला होता. वादळी वाऱ्यामुळे रब्बी हंगामातील केळी पिकांचे आतोनात नुकसान झाले. त्यानंतर कृषी विभाग आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षात येऊन पंचनामे केले परंतु ३ महिने उलटूनही कंपनीकडून नुकसानीची रक्कम मिळाली नाही. संबंधित कंपनीकडून नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. निवेदनावर रामजी गोरे, शुभम गोरे, रामेश्वर साळवे, बालाजी हामदे, भारत गोरे, आनंदा खांडरे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सरकारी रुग्णालयांत दररोज रंगीत बेडशीट्सचा वापर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३० ऑक्टोबर -**
रुग्णालयातील संक्रमणजन्य आजारांचा धोका कमी करण्यासाठी राज्य शासनाने एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. आता सरकारी रुग्णालयांत प्रत्येक दिवशी वेगवेगळ्या रंगांच्या बेडशीट्स वापरण्यात येणार असून, बेडशीट, उशांचे कव्हर, ब्लँकेट, पडदे, गणवेश, टॉवेल आदी वस्त्रांची निर्जंतुक धुलाई पूर्णतः यांत्रिक पद्धतीने केली जाणार आहे.

उदगीर येथील सामान्य रुग्णालयात दररोज सुमारे २ हजार बाह्यरुग्णांची नोंदणी होते, तर शेकडो रुग्ण उपचारासाठी दाखल होतात. शस्त्रक्रियेनंतर किंवा प्रसूतीनंतर रुग्णांना संक्रमणाचा धोका अधिक असल्याने हा निर्णय रुग्णांच्या आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

प्रत्येक दिवशी ठरावीक रंगाच्या बेडशीट्स वापरण्याचा निर्णय घेतला गेला आहे. त्यामुळे कोणत्या बेडवर नवे बेडशीट टाकले गेले आहे की नाही हे लगेच ओळखता येईल. यामुळे स्वच्छतेच्या कामात पारदर्शकता आणि जबाबदारी वाढणार आहे.

यांत्रिक धुलाईमुळे वस्त्रांचे पूर्ण निर्जंतुकीकरण प्रभावीपणे होईल, परिणामी संक्रमणजन्य आजारांचा प्रसार रोखण्यास मदत होईल. हा निर्णय विशेषतः अतिदक्षता विभाग, नवजात बालके व शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांसाठी लाभदायी ठरणार आहे.



# शेतकऱ्यांना अनुदान आणि हमीभाव न मिळाल्याने संताप

## शिवसेना शेतकरी सेनेचा शासनाला इशारा... सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा...!




**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३०, ऑक्टोबर -**
तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे सोयाबीनचे मोठे नुकसान झाले असून अनेक हेक्टर जमिनीवरील माती वाहून गेली आहे. रब्बी हंगामासाठी पेरणी करणे शेतकऱ्यांना अवघड झाले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने हेक्टरी १८ हजार ५०० रुपये तीन हेक्टरपर्यंत मदतीची घोषणा केली होती, मात्र अजूनही सुमारे ५० टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर एक रुपयाही जमा झालेला नाही, असा आरोप करण्यात आला आहे.

काही शेतकऱ्यांना केवळ ८,५०० रुपये दोन हेक्टरपर्यंतच मदत देण्यात आली असून, रब्बी पेरणीसाठी जाहीर केलेले १० हजार रुपये अनुदान सुद्धा अद्याप खात्यात जमा झालेले नाही. या अनुदानाचे अधिकार महसूल विभागाकडून कृषी विभागाकडे का दिले गेले, याबाबतही शंका व्यक्त करण्यात आली.

याशिवाय, मुख्यमंत्र्यांनी हेक्टरी १७ हजार रुपये पिकविमा जाहीर केला असला तरी तो विमा कंपनी देणार की शासन, हेही स्पष्ट नाही, असे शेतकरी संघटनांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळणारे हे सरकार आहे, अशी टीका करत शिवसेना शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. आण्णासाहेब मिरगाळे यांनी शासनाविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शासनाने घोषित केलेला सोयाबीनचा हमीभाव ५३२८ रुपये असताना, बाजार समित्यांमध्ये सोयाबीन ३८०० रुपयांनाच विकला जात आहे. त्यामुळे प्रत्येक क्विंटलला दीड हजार रुपयांचा फरक शेतकऱ्यांच्या खात्यात पावतीप्रमाणे जमा करावा, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच, सोयाबीन खरेदी केंद्र तात्काळ सुरू न केल्यास तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा शासनाला इशारा देण्यात आला आहे.

या प्रसंगी निलंगा विधानसभा प्रमुख शिवाजी पांढरे, अल्पसंख्याक सेलचे तालुकाप्रमुख लायकपाशा शेख, महिला आघाडी तालुकाप्रमुख सविताताई पांढरे, उपतालुकाप्रमुख मंगलबाई कांबळे, अरुणाताई माने, नागिनबाई सुरवसे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## ढाळेगाव तलावात मगर दिसल्याची चर्चा; वनविभागाचा सतर्कतेचा इशारा




**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३०, ऑक्टोबर-**
अहमदपूर तालुक्यातील ढाळेगाव येथे तलावात मगर दिसल्याची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाने तात्काळ तपास सुरू करून परिसरात खबरदारीचे उपाययोजना केल्या आहेत.

ढाळेगाव येथील शेतकरी गोपाळ शिवाजी बुजारे यांनी दि.२३ ऑक्टोबर रोजी भ्रमणध्वनीद्वारे अहमदपूर वनविभागाला तलावात मगर दिसल्याची माहिती दिली. त्यानंतर वनरक्षक होनराव यांनी तलाव परिसरात भेट देऊन पाहणी केली व स्थानिक शेतकऱ्यांकडून माहिती घेतली.

वनपरिक्षेत्र अधिकारी नागरगोजे आणि वनपरिमंडळ अधिकारी गोविंद माळी यांनी तीन दिवस या भागावर विशेष लक्ष ठेवले. मात्र या काळात मगर दिसून आली नाही. तरीही खबरदारीचा उपाय म्हणून तलावाजवळ मगरीपासून सावध राहा असे फलक लावण्यात आले आहेत. ढाळेगावचे उपसरपंच शिवाजीराव भिकाने यांनी गावकऱ्यांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले.

तलावात धुणी-धुवणे, पोहणे तसेच जनावरे पाण्यावर नेणे टाळावे, असे सांगून गावात दवंडी देण्यात आली. तसेच, जर पुन्हा मगर आढळून आली तर त्वरित वनविभागास कळवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अहमदपूरहून श्रीक्षेत्र कपिलधारकडे राष्ट्रसंत माऊलींची महापदयात्रा मार्गस्थ



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.३०, ऑक्टोबर-**
अहमदपूर येथील राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या संजीवन समाधीस्थानापासून चापोली मार्गे श्रीक्षेत्र कपिलधारकडे जाणारी ७१ वी महापरयात्रा रविवारी भव्य शोभायात्रेसह अहमदपूर शहरातून मार्गस्थ झाली.

सुमारे ७० वर्षांपूर्वी राष्ट्रसंत माऊलींनी चापोली येथून कपिलधार पदयात्रेची परंपरा सुरू केली होती. अध्यात्म आणि विज्ञान यांची सांगड घालणारी, जीवनातील ताणतणाव दूर करून स्वावलंबनाचा संदेश देणारी ही पदयात्रा भक्तांच्या श्रद्धेचे प्रतीक मानली जाते.

पदयात्रा प्रारंभी भक्तीस्थळावर राष्ट्रसंतांच्या उत्तराधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज यांच्या हस्ते समाधी रुद्राभिषेक व अशोक पूजन करण्यात आले. त्यानंतर चापोली येथील मलेशे परिवाराच्या मानाच्या ध्वजपूजनानंतर अश्वासह मिरवणुकीला सुरुवात झाली. मिरवणूक शहरातील शिवाजी चौकात पोहोचल्यावर यात्रेतील प्रमुख संत बसव महाराज निलंगा मठ, आचार्य गुरुराज स्वामी महाराज, भक्तीस्थळ प्रमुख बसवेश्वर महाराज चिंचोलीकर, रा. चलिंग महाराज हंगरगा, मनमत आप्पा पालापुरे, शिवलिंग पाटील किनीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सोलापुरे परिवार व महाजन परिवार यांच्या वतीने भाविकांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी माजी मंत्री बाळासाहेब जाधव, रामजी महाजन (पुणे), अनिल कासनाळे, राजकुमार कल्याणी, विनोद हिंगणे, अभय मिरकले, संदीप चौधरी, भीमाशंकर शेटकार, गिरीश शेटकर, रंजना नाकसाखरे, जयश्री बारोळे, आशा बेंबळे, उषा बेंबळे, कल्पना बेंबळे, तसेच महाजन व शेटकार परिवारातील अनेक भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## दैठणा येथे आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांची सांत्वनपर भेट

**तभा वृत्तसेवा**
**दैठणा, दि.३०, ऑक्टोबर -**
निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार व माजी पालकमंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांनी दैठणा येथे दुःखित कुटुंबांना भेट देऊन सांत्वन केले.

प्रकाश गुडे यांच्या मातोश्री हरूबाई गुडे तसेच सिद्धार्थ तोटे यांचे वडील दत्तात्रय तोटे यांच्या निधनानंतर आमदार निलंगेकर यांनी त्यांच्या घरी भेट देऊन कुटुंबीयांना धीर दिला. या वेळी त्यांनी दुःखात आपण एकटे नाही, आम्ही सर्व सोबत आहोत, असे सांगत कुटुंबांना मानसिक आधार दिला.

या प्रसंगी भाजपचे स्थानिक कार्यकर्ते व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दैठण्यात समाज मंदिर बांधकामाचा शुभारंभ

### आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते भूमिपूजन...



**तभा वृत्तसेवा**
**दैठणा, दि.३०, ऑक्टोबर -**
दैठणा गावाच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने आणखी एक महत्वाचे पाऊल टाकत येथील समाज मंदिर बांधकामाचा शुभारंभ भूमिपूजनाने दि.२९ ऑक्टोबर रोजी संपन्न झाला. हा सोहळा निलंगा विधानसभा मतदारसंघाचे आमदार व माजी मंत्री संभाजी पाटील निलंगेकर यांच्या हस्ते पार पडला.

या प्रसंगी गावातील मान्यवर, नागरिक आणि भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला मंगेश पाटील, गोविंदराव चिलकुरे, माधव बिरादार, संजय बोरकर, ज्ञानेश्वर चेवले, बाबासाहेब सुरवसे, संजय दोर्वे, धोंडीराम सांगवे, सागर मरुडकर, संग्राम हवा, अनिल शिंदे, सदानंद पाटील, प्रसाद पाटील, पांडुरंग पाटील, धनंजय स्वामी, राजीव नमनगे, माधराव बिरादार, अण्णाराव पाटील, माधव खंदारे, विलास पाटील, तसेच सरपंच शेषराव कांबळे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी आपल्या मनोगतात आमदार पाटील म्हणाले, समाज मंदिर हे गावाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाचे केंद्र आहे. यामुळे ग्रामसंघटनेस बळ मिळेल. दैठणा गावाचा सर्वांगीण विकास हा आमचा प्राधान्यक्रम असून पुढील काळातही विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल.

गावकऱ्यांनी आ. पाटील यांच्या विकासाभिमुख कार्याचे कौतुक करून त्यांचे आभार मानले.

## लातूरमध्ये उभारला जाणार 'स्टॅच्यु ऑफ नॉलेज'; डॉ. आंबेडकरांचा ७५ फुटी पुतळा



१० कोटी निधीस प्रशासकीय मान्यता... भाजपकडून आनंदोत्सव साजरा...

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.३०, ऑक्टोबर -**
लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान परिसरात 'स्टॅच्यु ऑफ नॉलेज' अर्थात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७५ फुटी भव्य पुतळा उभारण्यात येणार आहे. या कामाला प्रशासकीय मान्यता मिळून १० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, यानिमित्ताने शहर भाजपच्या वतीने आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि फटाक्यांची आतषबाजी करत हा आनंद सोहळा साजरा झाला. या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे विशेष आभार कव्हेकर यांनी मानले.

हा उपक्रम तत्कालीन खासदार सुधाकर शृंगारे यांच्या संकल्पनेतून सुरू झाला होता. त्यावेळी विद्यमान मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकल्पाला विशेष बाब म्हणून मंजुरी दिली होती.

मात्र काही विरोधी पक्षांनी या प्रकल्पाला विरोध दर्शवून अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. तरीही भाजपचे लोकप्रतिनिधी आणि शहर संघटनांनी सातत्याने पाठपुरावा करून अखेर हा ऐतिहासिक क्षण साधला. शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले, स्टॅच्यु ऑफ नॉलेज उभारणीमुळे लातूर शहराच्या सौंदर्यात भर पडेलच, पण सामाजिक एकता, राष्ट्रप्रेम आणि डॉ. आंबेडकरांच्या विचारांची प्रेरणा पुढील पिढ्यांना मिळत राहील.

लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते भूमिपूजन होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी माजी जिल्हाध्यक्ष देविदास काळे, शहर सरचिटणीस संजय गीर, निखील गायकवाड, प्रविण कस्तुरे, महिला मोर्चा अध्यक्षा शितल मालू, युवा मोर्चा अध्यक्ष ओम धरणे, तसेच विविध आघाडी व मोर्च्यांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शहरभर या निर्णयाचे स्वागत होत असून, लातूरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा ७५ फुटी भव्य पुतळा उभारला जाणार ही बाब लातूरकरांसाठी अभिमानाचा क्षण ठरत आहे.

## उदगीरच्या साहित्यिक चळवळीने घेतलेली भरारी नावलौकिक वाढवणारी : रामचंद्र तिरुके

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३०, ऑक्टोबर -**
साहित्य चळवळ आणि लेखन या दोन्ही क्षेत्रात उदगीरने घेतलेली भरारी ही उदगीरच्या नावलौकिकात भर टाकणारी आहे, असे मत मराठवाडा साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीचे उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके यांनी व्यक्त केले.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा 'बालसाहित्याचा रघुनाथ शिवराम बोरसे स्मृती पुरस्कार' प्राप्त झाल्याबद्दल संजय ऐलवाड यांचा मराठवाडा साहित्य परिषद, उदगीर शाखेच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परिषदेचे उदगीर शाखा अध्यक्ष धनंजय गुडसूरकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिता येलमटे यांनी केले. बदलत्या काळात वाचनाचे संस्कारच नव्या पिढीला आणि मानवजातीला कल्याणकारी ठरतील, असे मत व्यक्त करत तिरुके म्हणाले, लिहिणाऱ्या हातांना व वाचकांना बळ देणे ही काळाची गरज आहे. चांगले साहित्य निर्माण झाले पाहिजे आणि त्या साहित्याचा गौरव झाला पाहिजे, तरच वाचन संस्कृती मजबूत होईल.

सत्काराला उत्तर देताना संजय ऐलवाड यांनी पर्यावरण विषयक प्रश्नांवर भाष्य केले. त्यांनी म्हटले की, साहित्याच्या माध्यमातून पर्यावरणाचे गांभीर्य समाजापर्यंत पोहोचवता येते आणि त्यातून परिणामकारक बदल घडवून आणता येतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामदास केदार यांनी केले, तर प्रा. प्रवीण जाहूरे यांनी आभार मानले.

यावेळी विश्वनाथ बिरादार माळेवाडीकर, सुरेखा गुजलवार, लक्ष्मण बेंबडे, विश्वास पडिले, चंद्रदीप नादरगे, राजीव गुणाले यांच्यासह अनेक साहित्यरसिक उपस्थित होते.

# उजनी येथे संत गणेशनाथ महाराज संजीवन सोहळा व यात्रा महोत्सवास प्रारंभ

## शतकानुशतकांची अखंड परंपरा कायम...

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.३०, ऑक्टोबर -**
गेल्या साडेतीन शतकाहून अधिक परंपरेचा वारसा लाभलेल्या औसा तालुक्यातील उजनी येथील श्री संत गणेशनाथ महाराज संजीवन सोहळा व यात्रा महोत्सवास यावर्षी सुरुवात झाली आहे. पंधरा दिवस चालणाऱ्या या महोत्सवात गाथा भजन, रामायण पारायण, हरिपाठ, हरिकिर्तन, हरिजागर, काकडा आरती, भुपाळी, विष्णुसहस्रनाम व नामजप अशा विविध धार्मिक कार्यक्रमांची मुशाफिरी होणार आहे. त्याचबरोबर शास्त्रीय संगीत गायन-वादन, जंगी कुस्त्या, पालखी मिरवणुका आणि भारुड या सांस्कृतिक कार्यक्रमांचीही रेलचेल राहणार आहे.



या महोत्सवाची सुरुवात तुकादास शहाजी भगवान काटे यांच्या कीर्तनाने झाली. त्यानंतर दररोज देशभरातील नामवंत कीर्तनकारांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होत आहे. यात नवनाथ महाराज चिखलीकर, कुमार पाटील महाराज गांजनखेडा, प्रा. बाळासाहेब महाराज देहूकर, माधव महाराज ढाकणी (आळंदी), महादेव महाराज (बीड), गुरु कान्होबा महाराज देहूखर, अमोल महाराज पल्ले (लातूर) यांचा समावेश आहे.

पुढील दिवसांत गणेश महाराज सोनवणे (आळंदी), जयेश महाराज भाग्यवंत (मुंबई), सुधाकर महाराज इंगळे (सोलापूर), किशोर महाराज खरात (नाशिक), उमेश महाराज दसरथे (आळंदी) आणि ज्ञानेश्वर महाराज कदम (आळंदी) यांच्या कीर्तनाचे आयोजन आहे. बुधवार, दि.५ ऑक्टोबर रोजी योगीराज महाराज उजनी यांचे महाप्रसादीय कीर्तन होणार असून, दुपारी गोपाळपुर बाजार चौकात गोपाळकाला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार, दि.२ ऑक्टोबर रोजी शास्त्रीय भजनाचा कार्यक्रम, त्यानंतर पं. जगदीश चव्हाण (मुंबई) व पं. संजय गरुड (पुणे) यांचे चक्रीभजन होणार आहे. मंगळवार, दि. ४ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री पालखी मिरवणूक, तसेच पहाटे तेरणे नदीकाठी शोभेची आतषबाजी होणार आहे. बुधवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी रात्री शास्त्रीय संगीत गायन-वादनाचा कार्यक्रम होणार असून, त्यात पं. ऋषीकेश बडवे व अस्मिता चिंचाळकर गायन करणार आहेत. त्यांना पं. राहुल गोळे (हार्मोनियम) यांची साथ लाभणार असून, प्रसाद करंमबेळकर, अभय जबडे, पांडुरंग मुकडे, व्यंकट ढवण तबल्यावर साथ देणार आहेत.

गुरुवार, दि.६ ऑक्टोबर रोजी तेरणे फडावर नामवंत मल्लांच्या जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, या वर्षी तरुणांमध्ये कुस्त्यांची आवड निर्माण व्हावी म्हणून लहान मल्लांच्या स्पर्धांचेही विशेष आयोजन करण्यात आले आहे.

### शास्त्रीय संगीत गायन-वादनाची अखंड परंपरा कायम

श्री संत गणेशनाथ महाराज संजीवन समाधी सोहळा व यात्रा महोत्सवानिमित्त गावचे सुपुत्र आणि विख्यात तबलावादक पांडुरंग मुकडे यांनी १९६३ साली शास्त्रीय संगीत गायन-वादनाच्या कार्यक्रमाची परंपरा सुरू केली. या मंचावर आजपर्यंत डॉ. सुहासिनी कोरटकर (पुणे), उपेंद्र भट, हरिश्चंद्र गवारे, बकुळ पंडित (मुंबई), पं. प्रभाकर कारेकर, जयतीर्थ मेवुंडी (धारवाड), आनंद भाटे, उस्ताद उस्मान खान, पद्मश्री उल्हास कशाळकर, पद्मश्री सुरेश तळवळकर यांसारख्या प्रख्यात कलाकारांनी हजेरी लावली आहे.

## नळेगावच्या तलाठ्याने ४० हजारांची लाच मागितली; चाकूर पोलिसांत गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.३०, ऑक्टोबर -**
चाकूर तालुक्यातील नळेगाव येथील तलाठी अमोल रामशेट्टे यांच्यावर ४० हजार रुपयांच्या लाचेची मागणी केल्याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने (एसीबी) गुन्हा दाखल केला आहे.

नळेगाव येथील एका ५२ वर्षीय व्यक्तीने व त्यांच्या भावाने गट क्रमांक ८२७/०१ मधील १० आर जमीन खरेदी करून कोर्ड डिग्री केली होती. या जमिनीची फेरफार नोंद करण्यासाठी ते तलाठी कार्यालयात गेले असता, तलाठी रामशेट्टे यांनी या कामासाठी ४० हजार रुपयांची लाच मागितली, अशी तक्रार तक्रारदाराने एसीबीकडे केली.

एसीबी लातूरच्या अधिकाऱ्यांनी तक्रारीची पडताळणी केली असता, तलाठी यांनी ३९ हजार रुपयांची तडजोडीची लाच एका खाजगी व्यक्तीकडे देण्यास सांगितली. त्यानुसार, १४, १५ आणि २८ ऑक्टोबर रोजी सापळा रचण्यात आला. मात्र तलाठी रामशेट्टे यांना संशय आल्याने त्यांनी लाच स्वीकारण्यास नकार दिला.

यानंतर एसीबीचे पोलिस उपअधीक्षक संतोष बर्गे यांच्या फिर्यादीवरून चाकूर पोलिस ठाण्यात तलाठी अमोल रामशेट्टे यांच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# कांडली बुद्रुक येथील तरुणाचा प्रेम प्रकरणातून अपहरण करून खून

तभा वृत्तसेवा
तामसा, दि. ३० ऑक्टोबर-

हिमायतनगर तालुक्यातील कांडली (बु.) येथील एका तरुणाचा प्रेम प्रकरणातून अपहरण करून खून केला व प्रेत भोकर तालुक्यातील सिंगारवाडी शिवारातील विहिरीत टाकल्याची घटना दिनांक २८ रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे कांडली गावात मोठी खळबळ उडाली असून तामसा पोलिसांनी अपहरण करून खून केल्याचा गुन्हा दाखल करून दोन आरोपीला अटक केली.



कांडीली (बु.) येथील नकुल संजय पावडे (वय १७) हा संभाजीनगर येथे शिक्षण घेत होता. दिवाळीनिमित्त तो आपल्या गावाकडे आला होता. दि. २६ रोजीचे मध्यरात्रीपासून आपला मुलगा घरी परत आला नसल्याने त्याचे वडील संजय शिवाजी पावडे यांनी नकुलचा आपल्या नातेवाईकासह सर्वत्र शोध घेतला. परंतु नकुलचा कोठेही पत्ताच लागला नसल्याने त्यांनी दि. २७ रोजी तामसा पोलीस ठाणे गाठून आपला मुलगा नकुलचे अपहरण झाल्याची फिर्याद दिली होती. पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली. नांदेडच्या स्थानिक गुन्हे शाखेची तपास कामी मदत घेतली होती. स्थानिक गुन्हा शाखेने तपासाअंती गणेश संभाजी दारेवाड (वय ३९) व विशाल गणेश दारेवाड (वय १९) दोघेही राहणार कांडीली (बु.) बाप लेकाला संशयित म्हणून ताब्यात घेतले. पोलिसांनी पोलिसी खाक्या दाखवताच दोन्ही संशयीतानी नकुलचा खून करून प्रेत पोत्यात बांधून भोकर हद्दीतील सुधा नदी काठच्या सिंगारवाडी शिवारातील एका विहिरीत टाकल्याची कबुली दिली. तामसा पोलिसांनी घटनास्थळी जाऊन दि. २८ रोजीच्या मध्यरात्रीनंतर ३ वाजताचे दरम्यान मयत नकुलचे प्रेत विहिरीबाहेर काढले. तामसा प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रेतावर शेववविच्छेदन केले. पोलिसांनी अटक केलेल्या दोन्ही आरोपीतील एकाची मुलगी तर दुसऱ्याच्या विवाहीत बहिणीसोबत नकुलचे प्रेमसंबंध होते. तिच्या लग्नानंतरही तो तिला त्रास देत असल्याने त्याचा खून केल्याची कबुली दिल्याचे तामसा पोलिसांनी सांगितले. तामसा पोलिसांनी दोन्ही आरोपीविरुद्ध अपहरण करून खून केला व पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने प्रेत विहिरीत टाकून दिल्याचे कलमान्वय गुन्हा दाखल केला. तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शहादेव खेडकर यांचे मार्गदर्शनाखाली पुढील तपास फौजदार बालाजी नरोटे हे करीत आहेत. दोन्ही आरोपीला भोकर न्यायालयात हजर केले असता आरोपीला दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावण्यात आली.

# अवैध वाळू उपशाचा धडाका; महसूल व पोलिस प्रशासनाचे मौन संशयास्पद!

तभा वृत्तसेवा
नरसी, दि. ३० ऑक्टोबर-

नायगाव तालुक्यात शासनाने वाळू उपशावर घातलेली बंदी केवळ कागदावर राहिल्याचे चित्र दिसत आहे. प्रत्यक्षात मात्र लोहा तालुक्यातील काही वाळू माफिया भरदिवसा आणि रात्रीच्या वेळी गोदावरी नदीपात्रातून टाईटानिक जहाजा सारखे सक्शन पंप व बोटींच्या सहाय्याने वाळू उपसत आहेत. संबंधित महसूल व पोलिस विभागाचे अधिकारी या बेकायदेशीर धंद्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप नागरिकांकडून होत असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात सर्वसामान्यांत तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

बरबडा व टाकळी अंतरगाव परिसरात रोज १५ ते २० सक्शन पंपांच्या सहाय्याने हजारो ब्रास वाळू नदीतून उपसली जाते. ही वाळू लोहा तालुक्यातील येळी, कामळज, कौडगाव येथे साठवून मोठ्या हायवा टिपरमधून मारतळा,



कहाळा, मांजरम,गडगा, कौठा, गोणार मार्ग मुखेड व मारतळा ते कहाळा, नायगाव परिसरात खुलेआम विक्रीसाठी पोहोचवली जात असल्याचे समोर आले आहे.


लोहा येथील महसूल विभाग आणि उस्माननगर , कुंटूर, नायगाव पोलीस विभागातील काही अधिकाऱ्यांची मुक संमती असल्याची चर्चा स्थानिक नागरिक करीत आहेत. तलाठी, मंडळ अधिकारी आणि लोहा तहसील कार्यालयातील संबंधित अधिकारी यांना या अवैध व्यवसायातून दरमहा ठराविक हिस्सा मिळत असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. नागरिकांकडून तोंडी व लेखी तक्रारी देऊनही प्रशासन गप्प राहिल्याने संशय अधिक गडद झाला आहे. उलट तक्रारदारांना अमाप माया जमा केलेले मुजोर वाळू माफियांकडून धमक्या मिळत असून, प्रशासन त्यांच्याच बाजूने असल्याचा आरोप केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे शासनाच्या महसुलाला लाखो रुपयांचा तोटा होत आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी व पोलिस अधीक्षकांनी वेगवेगळे पथक तयार करून तातडीने संबंधित महसूल व पोलिस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी सर्व सामान्य नागरिकांकडून जोर धरत आहे.

# शिवसेना पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे : रोहिदास चव्हाण

तभा वृत्तसेवा
लोहा, दि. ३० ऑक्टोबर-

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका निवडणुका शिवसेना (उबाठा )पक्षानी महाविकास आघाडीच्या माध्यमातून पूर्ण ताकदीने लढविणार असून, त्याअनुषंगाने लोहा-कंधार शिवसेना पदाधिकाऱ्यांशी संवाद साधण्यासाठी शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माजी आमदार तथा लातूर जिल्हा संपर्कप्रमुख रोहिदास चव्हाण यांनी सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी जोमाने कामाला लागावे, असे आवाहन केले.



शिवसेना पदाधिकाऱ्यांनी आपल्या जि.प. गटात व गणात, गाव वाडी तांड्यावर जबाबदारी घेऊन काम करावे. येत्या चार दिवसांत इच्छुकांच्या मुलाखती घेणार असल्याचेही चव्हाण म्हणाले.

यावेळी माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ चव्हान, उपजिल्हाप्रमुख सतीश पाटील उमरेकर, उपजिल्हाप्रमुख भालचंद्र नाईक, पुरुषोत्तम धोंडगे, गणेश कुंटेवार, विधानसभा संघटक सुरेश पाटील हिलाल, विधानसभा प्रमुख बसंत पा. शिंदे, तालुकाप्रमुख भीमराव शिंदे ,तालुकाप्रमुख बालाजी गाडेकर, कंधार शिवसेना तालुकाप्रमुख परमेश्वर जाधव, माजी नगरसेवक रामकिशन पारेकर, शिक्षक सेनेचे खंडू पवार, साईनाथ पाटील, उपतालुकाप्रमुख परमेश्वर घोरपडे, विश्वनाथ पवार, शक्ती वने, संतोष ढवळे, राहुल ससाणे, दादाराव पाटील, संतोष घोरबांड, निरंजन वाघमारे यांच्यासह शेकडो शिवसेना पदाधिकारी या आढावा बैठकीस उपस्थित होते.

# भोकर येथे आज मॅरेथॉन स्पर्धा

तभा वृत्तसेवा
भोकर, दि. ३० ऑक्टोबर-

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त पोलीस प्रशासनाच्या वतीने मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षीस व ट्रॉफी प्रदान करण्यात येणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त खेळाडूसह युवक युवतीने या स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन पोलीस निरीक्षक अजित कुंभार यांनी केले आहे.

# तृष्णा तोटरे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल केल्याने भाजपा कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**नायगाव**-राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका साठी नुकत्याच जाहीर झालेल्या आरक्षण सोडतीन्वये नायगाव तालुक्यातील नरसी जिल्हा परिषद सर्कल हे अनुसूचित जाती (महिला) प्रवर्गासाठी आरक्षित झाले आहे. यापार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या तिकिटावर उमेदवारी मिळावी या मागणी साठी गौरी शेळगाव ता.नायगांव येथील सौ. तृष्णा मनोहर तोटरे यांनी आपला उमेदवारी अर्ज सादर केला आहे.



आज, दि.२९ ऑक्टोबर रोजी बुधवारी दुपार नंतर माननीय आमदार राजेश पवार यांच्या नायगाव येथील संपर्क कार्यालयात दत्ता पाटील ढगे यांच्याकडे रीतसर अर्ज दाखल करण्यात आला या वेळी ॲड. रुपेश हाके उपस्थित होते. सौ. तृष्णा मनोहर तोटरे ह्या गौरी शेळगांव येथील उच्च विद्याविभुषीत असुन. त्यांना सामाजिक कार्या ची जाणीव आहे.व सर्वसामान्य जनतेत मिसळणारा स्वभाव आहे . यामुळे त्या परिसरातील जनतेच्या विशेष पसंतीस उतरल्या आहेत. त्यांचे पती प्रा. डॉ. मनोहर तोटरे हे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महा विद्यालयाचे प्राचार्य असून शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे. सौ. तोटरे यांच्या उमेदवारी अर्ज सादरीकरणावेळी कार्यकर्त्यांनी नरसी जि प सर्कल मधील स्थानिक नेतृत्वाला संधी मिळाली पाहिजे अशी मागणी केली. या निमित्ताने नायगांव तालुक्यातील भाजपा कार्य कर्त्यांमध्ये मोठ्याउत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिक पातळीवरील महिलांना राजकीय सक्षमी करणाची दिशा मिळावी आणि गावपातळीवरील नेतृत्वाला जिल्हा परिषदेत योग्य प्रतिनिधित्व मिळावे, हा सौ. तोटरे यांच्या उमेदवारी मागणी मागचा मूळ हेतू असल्याचे यावेळी सांगण्यात येत आहे.

# पुन्हा आसमानी संकट अती पावसामुळे बळीराजा पूर्णतः उध्वस्त

**हाणेगाव**-राज्यात परतीच्या मान्सूनने थैमान घातले असून, सततच्या अति पावसामुळे शेतकऱ्यांवर मोठे आसमानी संकट कोसळले आहे. खरीप हंगामातील काढणीला आलेली सोयाबीन, कांदा, मका आता कापूस मातीमोल झाली आहेत. नांदेड जिल्ह्यातील सीमेवरती भाग असलेला हाणेगाव परिसरातील गावच्या शेतीत पाणी साचल्याने कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे, ज्यामुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे. मागील काही दिवसांपासून चालुच आहे मध्येच चार दिवस उघाड दिला होता पण काल अचानक अवकाळी पावसाने हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. सोयाबीन: बहुतांश भागांत सोयाबीनचे पीक पूर्णपणे सडले असून, काही ठिकाणी शेतातच अंकुर फुटले आहेत. कापूस: वेचणीला आलेल्या कपाशीची बोंडे पावसामुळे कुजली असून, गुणवत्ता पूर्णपणे खालावली आहे. शेतकरी हवालदील झाला आहे एकीकडे नैसर्गिक संकटे आणि दुसरीकडे शेतीसाठी घेतलेले कर्ज यामुळे शेतकरी पुरता अडचणीत सापडला आहे. संपूर्ण वर्षभराचे श्रम आणि केलेली गुंतवणूक पाण्यात गेली आहे. आता कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा आणि कर्जाची परतफेड कशी करायची, असा प्रश्न प्रत्येक शेतकऱ्यासमोर उभा राहिला आहे. निसर्गाच्या या प्रकोपाने शेतकरी मानसिक आणि आर्थिकदृष्ट्या खचला आहे. वरुन राज्य शासन तुटपुंजी अनुदान जाहीर केला आहे याच्यातुन साधा एका बेगाचा ही खर्च निघेना सध्यातर शेतकरी आसमानी व सुलतानी संकटात सापडल्याचे चित्र सर्वत्र दिसत आहे.

# भोकरमध्ये पेरकेवार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळा

**नांदेड** -पेरकेवार, पेरकी, पेरकेवाड समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शासकीय नोकरीस लागलेल्या जिल्ह्यातील नवतरुणांचा गौरव सोहळा भोकर मध्ये आयोजित करण्यात आला होता यावेळी आमदार शंकर अण्णा पायली आमदार श्रीजयाताई चव्हाण यांच्यासह मान्यवरांनी मार्गदर्शन केले. भोकर तालुक्यासह जिल्हाभरात पेरकेवाड पेरकी पेरकेवार समाज अल्पसंख्यांक असून त्यांची राजकीय सामाजिक, आर्थिक सुधारणा व्हावी यासाठी शिक्षणाची अत्यंत गरज आहे हाच हेतू डोळ्यासमोर ठेवून सामाजिक कार्यकर्ते तथा कंत्राटदार गोविंदराव उल्लेवाड यांनी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शासकीय नोकरीस लागलेल्या नवतरुणांचा गौरव हा कार्यक्रम २६ ऑक्टोबर रोजी गणराज मंगल कार्यालय रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आला होता प्रारंभी शहरातून भव्य रॅली काढण्यात आली त्यानंतर आयोजित सत्कार सोहळा कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संयोजक गोविंदराव उल्लेवाड हे होते.दीप प्रज्वलन करुन उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला प्रमुख मार्गदर्शक आमदार शंकर अण्णा पायली यावेळी बोलताना म्हणाले आपला समाज गरीब असून विद्यार्थ्यांनी शिक्षण घेणे गरजेचे आहे, एकमेकांचे पाय न ओढता संघटन संघटित होऊन आपली वेगळी ओळख निर्माण करा. आमदार श्रीजयताई चव्हाण यांनी समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्नशील राहू असे मत व्यक्त केले गुणवंत विद्यार्थी व शासकीय नोकरीस लागलेल्या मान्यवर युवकांचा प्रशस्तीपत्र सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला, अध्यक्षीय समारोपात संयोजक गोविंदराव ऊलेवाड यांनी समाजाच्या विविध समस्या मांडल्या सर्वांनी संघटित होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले या कार्यक्रमास माजी आमदार गंपा गोवर्धन, सभापती जगदीश पा.भोशीकर, प्रकाश देशमुख भोशीकर, भाजपा तालुका अध्यक्ष दिवाकर रेड्डी सुरकुंटवाड, उपसभापती बालाजी शानमवाड, शकुंतला ताई एंबडवार, राम येरावर, संभाजी आलेवाड यांच्यासह जिल्ह्यातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रस्त्यांच्या अपूर्ण व प्रलंबित कामांमुळे वाहतुकीची परिस्थिती गंभीर

तभा वृत्तसेवा
किनवट, दि. ३० ऑक्टोबर-

किनवट प्रतिनिधी दि. ३० : किनवट तालुका आणि शहर परिसरात रस्त्यांच्या अपूर्ण व प्रलंबित कामांमुळे वाहतुकीची परिस्थिती गंभीर बनली आहे. बुधवारी दुपार पासून झालेल्या जोरदार पावसामुळे किनवट-नांदेड राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६१ (अ) वरील थारा ते सावरी दरम्यानचा रस्ता पूर्णपणे चिखलमय झाला असून, बुधवारी रात्रीपासून हा मार्ग वाहतुकीसाठी बंद पडला होता. या ठिकाणी सुमारे ५० फुट लांबीपर्यंत रस्त्यावर चिखल साचल्याने सिमेंटचे केमिकल वाहुन नेणारे एक अवजड वाहने अडकून पडल्याने रस्त्यावर अवजड वाहन अडकुन पडले यामुळे वाहनचालकांना



मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

त्यामुळे धानोरा किंवा नांदेड कडे जाणाऱ्या वाहनांना थारादिग्रसचंद्रपूर तांडासावरी या पर्यायी लहान रस्त्याचा वापर करावा लागत आहे. मात्र या मार्गावर वाहनांची मोठी गर्दी असून, विशेषतः अवजड वाहनांची लांबच लांब रांग लागली आहे. लहान चारचाकी वाहने कसाबसा मार्ग काढत असली तरी मोठ्या वाहनांच्या वाहतुकीला पूर्णतः अडथळा निर्माण झाला आहे. तरी या ठीकाणी किनवट पोलिस प्रशासनाने शर्तीचे प्रयत्न करुन दुपारी १ वाजे पर्यंत रस्ता सुरळीत केल्याची माहिती पोलिस हेड कॉन्स्टेबल प्रकाश बोदमवाड यांनी माध्यमांना दिली.

दरम्यान, किनवट शहरातील मुख्य रस्त्याचे कामही पुन्हा ठप्प झाल्याने शहरात वाहतूक कोंडी, खड्डे व अपघातांच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. शहरातील प्रमुख चौकामध्ये चिखल, पाणी साचणे व वाहनांच्या रांगा लागल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. तसेच गोकुंदा येथिल किनवट शिव ते बाळासाहेब ठाकरे चौक पर्यंत रस्त्यावर प्रचंड खड्डे पडल्याने वाहनचालकांना त्रास होत आहे. अपघात होण्याची शक्यता नाकारता येत आहे. राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित असुन या ठिकाणी रेल्वे उड्डाण पुलाचा विषय हि संबंधित राष्ट्रीय महामार्गाच्या कंत्राटदाराने अनेक वर्षांपासून प्रलंबित ठेवल्याने वाहतुक कोंडी व लहान मोठे अपघात हे नित्याचाच विषय झाला आहे.

त्यातच दक्षिण भारतातील मुसळधार पावसामुळे 'कृष्णा एक्सप्रेस' ही रेल्वे गाडी तिरुपती पर्यंत न जाता अर्धवट परत आल्याने परीनामी आदिलाबाद ते नांदेड अशी धावणारी इंटरसिटी एक्सप्रेस गाडी हि केवळ मुदखेड स्थानकापर्यंतच विलंबाने धावत असल्याने, किनवट तालुक्याचा जिल्हा मुख्यालयाशी रेल्वे संपर्कही तुटल्यासारखा झाला आहे.

त्यामुळे नागरिक, शासकीय कर्मचारी, विद्यार्थी तसेच व्यापारी वर्ग यांना प्रवासात मोठी गैरसोय भासत आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे. रब्बी हंगामाची पेरणी सुरू असताना व खरीप हंगामातील काढणीसाठी तयार पीक शेतातच अडकलेले आहे. सततच्या पावसामुळे आणि रस्ते बंद झाल्याने वाहतूक ठप्प झाल्याने पीक बाहेर काढणे, बाजारात पोचवणे अवघड झाले आहे. परिणामी आधीच अतिवृष्टीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना पुन्हा एकदा संकटाचा सामना करावा लागत आहे.नागरिक व शेतकरी यांचा प्रशासनाकडे मागणी आहे की, रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून वाहतूक सुरळीत करावी, तसेच शहरातील रस्त्यांची अपूर्ण कामे त्वरीत पूर्ण करून नागरिकांना दिलासा द्यावा.

# प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शहिद स्मारकांवर मोकाट कुत्र्यांचा ताबा



मिलिंद वाघमारे
देगलूर, दि. ३० ऑक्टोबर-

येथील स्वातंत्र्यसंग्रामात सहभागी झालेले सैनिक आणि शहीद जवानांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेली स्मारके प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आज दयनीय अवस्थेत दिसत आहेत. शहीद अब्दुल हमीद स्मारक, शहीद कॅप्टन डॉ. मनोज काशिनाथ आप्पा दयाडे चौक तसेच देगलूर पोलिस ठाण्यासमोरील भारतीय स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या स्मारकावर मोकाट कुत्र्यांचा संचार वाढला आहे. तर रोषणाईसाठी बसवलेले काही दिवे बंद पडले आहेत. तसेच काही स्मारकांवर गवतही उगवलेलं आहे.

लाखो रुपये खर्च करून उभारलेली ही स्मारके देगलूर शहराचे वैभव आहेत. येणाऱ्या पिढ्यांना राष्ट्रप्रेम, देशभक्ती आणि राष्ट्र स्वाभिमान शिकवणारी ही स्मारके प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे अक्षरशः कुत्रांचे निवासस्थान बनले आहेत, हे अत्यंत दुदैवी बाब आहे.

स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांच्या स्मृतींचा हा अपमान नाही का ? देगलूर नगरपरिषद प्रशासनाला राष्ट्रभक्ती आणि राष्ट्र स्वाभिमानाची जाणीव आहे का ? यावर आता प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. लाखो रुपयांची स्मारके उभारली पण अल्प दराचे दरवाजे बसवलेच नाहीत. तर कॅप्टन डॉ. मनोज काशिनाथ आप्पा दयाडे चौकाचे लोखंडी खुप लहान झाल्यामुळे मोकाट कुत्र्यांचा संचार स्वारकांवर होतांना दिसतोय.


विशेष म्हणजे, छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे आणि महात्मा बसवेश्वर स्मारक या ठिकाणी दरवाजे व कुंपण असल्याने मोकाट कुत्र्यांचा संचार नाही. मात्र, शहीद जवानांच्या स्मारकांकडेच दुर्लक्ष झाल्याने ही अवस्था पहावयास मिळते.

शासनाकडून स्वच्छतेसाठी लाखो रुपये खर्च केले जातात. राष्ट्रभक्ती आणि राष्ट्र स्वाभिमानाची प्रेरणा मिळावी म्हणून विविध उपक्रम राबवले जातात. परंतु देगलूर शहरातील शहीद स्मारकांची ही अवस्था पाहता, स्वच्छता आणि राष्ट्रप्रेम या दोन्ही मूल्यांकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष झाल्याचे दिसून येतं. नगरपरिषदेला नुकताच कामगिरीबद्दल पुरस्कार मिळाला असला तरी या स्मृतींचे रक्षण करण्यात अपयश आल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

# नांदेड-सुरत एक्सप्रेस रेल्वे सुरू करण्याची खासदाराकडे मागणी

तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. ३० ऑक्टोबर-

मराठवाडा जिल्ह्यातील व्यावसायिक,नोकरदारकर्मचारी वर्ग, औद्योगिक कर्मचारी, उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी व रोजगारानिमित्त मुंबई पश्चिम भागातील बोरीवली, भाईंदर, वसई-विरार तसेच पालघर, बोईसर, डहाणू व गुजरातमधील वापी,वलसाड,सुरत या ठिकाणी बरेच लोक स्थायिक झालेले आहेत.



सदर भागातून छत्रपती संभाजी नगर, हिंगोली, परभणी, नांदेड धर्माबाद या भागात दळणवळणासाठी एकही रेल्वे गाडी नाही. त्यामुळे प्रवास करताना अनेक ठिकाणाहून रेल्वे गाड्या बदलत जोखमीचा प्रवास करावा लागत आहे. तसेच वाढत्या प्रवाशांमुळे रेल्वेचे आरक्षण मिळणे दिवसेंदिवस कठीण होत आहे.

मुंबई पश्चिम भागातील 'मराठवाडा मित्र मंडळाच्या १वतीने प्रतिनिधी म्हणून दर्शन भंडारे यांनी नांदेड ते सुरत व सुरत ते नांदेड व्हाया कल्याण-वसईविरार मार्गे अशी दैनंदिन धावणारी एक्सप्रेस रेल्वेगाडी सुरू करण्याबाबतच्या मागणीचे लेखी निवेदन नांदेड-१६ लोकसभा सदस्य खासदार रविंद्र चव्हाण यांच्याकडे दिले आहे.

मराठवाड्यातून मुंबई व गुजरातला ये-जा करणार्या प्रवाशांची वारंवारिता जास्त व रेल्वे गाड्यांची वारंवारिता कमी असल्याने प्रवास करण्याच्या चिंतेने प्रवासी जनता हैराण आहेत. शैक्षणिक क्षेत्रातील उच्च शिक्षण घेण्यासाठी मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी नगर, नाशिक व मुंबईला जावे लागते. तसेच प्रशासकीय कर्मचारी, कापड व इतर व्यावसायिक, चखऊ तील नोकरदार वर्ग तसेच रोजगाराच्या शोधातील करमानी यांच्यासाठी एक्स्प्रेस रेल्वेगाडी सुरू झाल्यास अत्यंत सोईचे,सुरक्षित व सुखकर प्रवास होण्याची आशा आहे.

# समाधी सोहळ्याच्या निमित्त उमरीत उत्सव



तभा वृत्तसेवा
नांदेड, दि. ३० ऑक्टोबर-

उमरी तालुक्यातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सद्गुरू सदानंद बाबा महाराज यांच्या १०१ व्या संजीवन समाधी सोहळ्याच्या निमित्ताने उमरी शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मराठवाडा ,तेलंगणा, आंध्र प्रदेश तसेच नजीकच्या कर्नाटक राज्यातील असंख्य भाविक भक्तांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री सदानंद सद्गुरु बाबा महाराज यांच्या संजीवन सोहळ्यानिमित्त दरवर्षी येथे हजारो भाविकांची उपस्थिती असते. ७,८, व ९ नोव्हेंबर रोजी उमरी शहरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज सकाळी संजीवन समाधी मंदिरात काकड आरती, पूजाअर्चा, यानंतर दुपारी चार वाजता कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. ७ नोव्हेंबर रोजी श्री विक्रम महाराज नांदेडकर यांचे कीर्तन होईल. ८ नोव्हेंबर रोजी सकाळी माळावरचा गणपती येथे भाविकांची पायी पदयात्रा काढण्यात येईल. दुपारी श्री माधवराव वडगावे महाराज यांच्या कीर्तनाचा कार्यक्रम होईल. ९ रोजी सकाळी काकड आरती, महाअभिषेक पूजाअर्चा यानंतर शहरातून सद्गुरु श्री सदानंद बाबा महाराज यांच्या पादुकांची पालखी मिरवणूक निघेल. दुपारनंतर समाधी मंदिर परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. सर्व भाविकांनी या धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन संस्थानाधिपती अरविंद महाराज यांनी केले आहे.

# मुस्लिम बांधवांनी एकजूट होऊन येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीसाठी लढा द्यावा: सय्यद मोईन

तभा वृत्तसेवा
मुदखेड, दि. ३० ऑक्टोबर-

मुदखेड शहरातील रेल्वे स्टेशन मदिना नगर येथे दि. २८ ऑक्टोंबर रोजी ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे माजी प्रदेश अध्यक्ष सय्यद मोईन यांच्या प्रमुख उपस्थितीत सभा संपन्न

सय्यद मोईन यांनी या सभेत बोलताना म्हणाले कि देशात मुस्लिम समाजावर मोठ्या प्रमाणावर अन्याय होत आहेत म्हणून मुस्लिम समाजातील नेत्यांनी जातीवादी पक्षाच्या मागे न लागता तुमच्यासाठी एमआयएम पक्षाचे दरवाजे खुले आहेत असे जाहीर आवाहन केले.




मुदखेड शहरामधील मुस्लिम गल्ली व वार्डात रोड रस्ता नाल्यांची दुरअवस्था झाली याकडे सत्ताधाऱ्याचे सर्रास दुर्लक्ष केले जात आहे हे तुम्ही डोळ्यांनी पाहत आहात असेही सय्यद मोईन यांनी आपल्या भाषणात सांगितले आहे.

पुढे बोलताना म्हणाले कि शहरातील शादी खान्याचे बेहाल झाले असुन येथील मुस्लिम समाजांना आपल्या मुला मुलीचे लग्न करण्यासाठी नांदेडला जावावे लागत आहे यापेक्षा दुर्भाग्य काय असा प्रश्न सय्यद मोईन यांनी जाहीर सभेत मुस्लिम समाजापुढे उपस्थित केला.

कॉंग्रेस पक्षाने गेल्या अनेक वर्षापासून मुस्लिम समाजाला केवळ मतदानासाठी वापर केला असून संसद मध्ये मुस्लिम समाजाबद्दल बिल पास करायच असेल किंवा एखाद्या बिलाला विरोध करायच असेल तर एम आय एम पक्षाचे खासदार असदुद्दीन ओवेसी यांच्या सोबत एक ही कॉंगेस खासदार साथ देत नाहीत मग तुम्ही कॉंग्रेस पक्षाच्या नादाला का लागता असाही प्रश्न जाहीर सभेत उपस्थित केला.

शहरात मुस्लिम समाज मोठ्या प्रमाणावर असून या ठिकाणी विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी उर्दू कॉलेज नाही पिण्याला स्वच्छ पाणी मिळत नाही अशा मूलभूत सुविधे पासून समाजाला वेठीस धरतात या करिता मुस्लिम बांधवांनी एकजूट होऊन येणाऱ्या नगरपालिका निवडणुकीसाठी लढा द्यावा असे आव्हान सय्यद मोईन यांनी केले.

याप्रसंगी माजी मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला, माजी जिल्हाध्यक्ष मिर्झा अमजद बेग, विधानसभा अध्यक्ष अब्दुल लतीफ , शहराध्यक्ष मोहम्मद हुसेन, मौलाना हाफीज यहीया , मोहम्मद मजीद, मोहम्मद महमूद, मोहम्मद अफरोज बागवान, मोहम्मद मजीद यांच्यासह मुस्लिम समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा कार्यालय - पहिला माळा, जनता मार्केट, शिवाजीनगर, नांदेड. Mail : tbnanded@gmail.com, Mob. No.: 9850952439

सोलापूर तरुण भारत https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या दक्षता जनजागृती सप्ताहास प्रारंभ

**परभणी,/प्रतिनिधी :** दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी लाच लुचपत प्रतिबंधक विभागातर्फे २७ ऑक्टोंबर ते २ नोव्हेंबर या दरम्यान दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येणार असून दक्षता आपली सामुदायिक जबाबदारी या संकल्पनेतून या सप्ताहात या खात्याद्वारे उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

सोमवार २७ ऑक्टोंबर रोजी या सप्ताहास प्रारंभ करण्यात आला. सर्व सरकारी, निमसरकारी कार्यालयात भ्रष्टाचार निर्मूलनाबाबत शपथ घेवून मुख्यमंत्री यांचा संदेश वाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच गर्दीच्या ठिकाणी, पोस्टर्स, बॅनर्सद्वारे जनजागृती सुरु करण्यात आली. बुधवारी संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण रुग्णालय, भूमिअभिलेख कार्यालय, पंचायत समिती, पोलिस ठाणे, न्यायालय, बांधकाम विभागाचे कार्यालय, वीज वितरण कंपनी कार्यालय यासह बाजार, बसस्थानक आदी सार्वजनिक ठिकाणी भ्रष्टाचार निर्मूलना संदर्भात पोस्टर्स व बॅनर लावण्यात आले. त्याद्वारे लाच देणे अथवा लाच देणे हा गुन्हा आहे, या आशयाचे फलक नागरीकांचे लक्ष वेधून घेत होते.

दरम्यान, लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, टोल फ्री क्रमांक, ई-मेल आयडी वगैरे गोष्टींचीही जनजागृती या निमित्ताने केली जाणार आहे. लाच मागणाऱ्या लोकसेवकाविरुध्द तक्रार असल्यास नागरीकांनी तात्काळ लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे संपर्क करावा, असे आवाहन पोलिस उपअधिक्षक महेश पाटणकर यांनी केले आहे.

या स्नेहमिलन सोहळ्यास महेश कुलकर्णी, सतीश ईप्पर, नागेश जोशी, शिरीष चक्कवार, अश्विन कारंजकर, राजेश वटाणे, प्रदीप राठोड, सय्यद जुनेद, विकास वाव्हळ, गणेश महाजन, गणेश कदम, कृष्णा लोखंडे, मन्मथ टाले, निजाम काझी, विवेक मुक्कावार, श्रीरंग खांडेकर, जगदीश लाहोरे, गजानन आकोशे, रवी राऊत, श्रीकांत चव्हाण, संतोष हळदे, गणेश पोटेकर, सचिन गायकवाड आदी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिंतूर व बाहेरगावावरून दिवाळीनिमित्त आलेल्या सर्व मित्रांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. वीस वर्षांनंतर झालेली ही भेट सर्वांच्या मनात कायमस्वरूपी आठवण बनून राहिली.

### रन फॉर युनिटी कार्यक्रमात तालुक्यातील जनतेने सहभागी व्हा -पो.नि. खटाने

**पालम,/प्रतिनिधी :** सरदार वल्लभाई पटेल यांची १५० व्या जयंती निमित्त हा कार्यक्रम शुक्रवारी दि. ३१ आक्टोबर रोजी पालम पोलीस स्टेशनने आयोजित केला आहे.या कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट राष्ट्रीय एकता आणि एकतेची भावना वाढवणे हा आहे.सदरील कार्यक्रमासाठी पालम तालुक्यातील सर्व जनतेने शुक्रवारी सकाळी ६ वाजता पालम पोलीस स्टेशन येथे हजर राहून रन फॉर युनिटीमधे सहभागी होत एकता आणि एकतेची भावना साजरी करण्याचे आवाहन पोलिस निरीक्षक शेषराव खटाणे यांनी केले आहे.

### पूर्णेत आज मतदार यादी प्रसिध्द होणार- मुख्याधिकारी डॉ.उत्कर्ष गुट्टे यांची माहिती


**पूर्णा,/प्रतिनिधी :** नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रारब्ध मतदार यादीवर आलेल्या सर्व आक्षेप अर्जाची पूर्णा तहसील कार्यालयात दोन दिवस सुनावणी घेण्यात आली असून याचा संपूर्ण अहवाल उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला आहे ३१ ऑक्टोबर रोजी मतदार यादी प्रसिद्ध होणार असल्याची माहिती पूर्णा नगर परिषद मुख्याधिकारी डॉ. उत्कर्ष गुट्टे यांनी सांगितले.

पूर्णा नगर परिषदेच्या सार्वजनिक निवडणुकीसाठी नगरपालिका प्रशासनाने नगरपालिका हद्दीतील मतदारांची प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली होती त्यानंतर गावातील विविध नागरिकांनी या मतदार यादीवर आक्षेप अर्ज दाखल केले होते यामध्ये एकूण १८९२ नागरिकांनी आक्षेप दाखल झाले होते यामध्ये सर्वात जास्त आक्षेप प्रभाग ९ मध्ये दाखल झाले होते या सर्व आक्षेपासाठी ची सुनवणी पूर्णा तहसील कार्यालयामध्ये २६ व २८ ऑक्टोबर रोजी घेण्यात आली असून यानंतर त्याचा संपूर्ण अहवाल उपविभागीय अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला असून ३१ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती मुख्याधिकारी यांनी सांगितली.

### श्री सहस्त्रार्जुन महाराज जयंती निमित्त देवी मंदिर जीर्णोद्धार व भव्य सभागृह भूमिपूजन



**मानवत,/प्रतिनिधी-** श्री सो स क्षत्रिय समाज दक्षिण मुखी हनुमान मंदिर पंच मंडळ, मानवत येथे श्री. सहस्त्रार्जुन महाराज जयंती साजरी करण्यात आली. यानिमित्त मानवत नगरीचे विकास पुरुष डॉ. अंकुश लाड यांच्या पुढाकाराने रंगर गल्ली येथील देवी मंदिर जीर्णोद्धार आणि भव्य सभागृह बांधकामासाठी एक कोटी रुपयाचा आमदार राजेश दादा विटेकर यांच्यामार्फत निधी मंजूर करून घेतला असून माननीय आमदार राजेश दादा विटेकर यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. तत्पूर्वी मान्यवरांचे औक्षण करण्यात आले आणि समाजाच्या वतीने मान्यवरांचा भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना डॉक्टर श्री अंकुश भाऊ लाड यांनी एक वर्षाचे आत सभागृहाचे बांधकाम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले. यानंतर प्रमुख पाहुणे मा. आमदार श्री. राजेशदादा विटेकर यांनी मानवतमध्ये विविध विकासात्मक योजना आणणार असून मानवत मध्ये भव्य असे क्रीडा संकुल उभारण्यात येणार असल्याचे जाहीर केले. तसेच उभा महादेव मंदिर विकासासाठी देखील योजना प्रस्तावित असल्याचे सांगितले.



# राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्त्यांच्या अघोरी स्पर्धेमुळेच संपूर्ण शहर होर्डींगच्या विळख्यात

## विळख्यात : विद्रुप चित्र : पुतळ्यांपासून प्रमुख चौक व रस्ते होर्डींगच्या विळख्यात लुप्त

**मोहन धारासूरकर**
**परभणी/प्रतिनिधी-** राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्त्यांच्या अघोरी स्पर्धेमुळेच संपूर्ण शहर होर्डिंगच्या विळख्यात : विद्रुप चित्र : पुतळ्यांपासून प्रमुख चौक व रस्ते होर्डींगच्या विळख्यात लुप्त



परभणी,दि.२९(प्रतिनिधी) : मुख्य चौकांसह रस्त्या रस्त्यांवर विरोधी असो, सत्तारुढ राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी, त्या पाठोपाठ आता व्यावसायिकांनीसुध्दा अघोरी स्पर्धा सुरु करीत महानगरपालिकेच्या नाकावर टिच्चून ठिकठिकाणी हजारो होर्डींग झळकवून पुतळ्यांपासून प्रमुख चौक व रस्ते होर्डिंगच्या विळख्यात लूप्त केले आहेत.

महानगरपालिका हद्दीतील मुख्य चौकांसह रस्त्या रस्त्यांवर किंवा अन्य इमारतींवर बेकायदेशीरपणे होर्डिंग उभारणार्या पक्षांसह संस्था व प्रतिष्ठान व मंडळांविरोधात कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक नितीन नार्वेकर यांनी होर्डींग उभारणाऱ्या एजन्सीधारकांना वारंवार दिला. त्यामुळे संपूर्ण महानगरातील बेकायदा होर्डींग तातडीने हटविले जातील, असे अपेक्षित होते. दुर्दे व असे, हे बेकायदा होर्डींग हटले तर नाहीच, उलटपक्षी संपूर्ण महानगरातील प्रमुख चौक व रस्त्या रस्त्यांवर दुतर्फा, इमारतींवर किंवा महापालिकेच्या पथदिव्यांच्या पोलवरच विरोधी असो, सत्तारुढ राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी गेल्या वर्षभरापासून बेकायदेशीरपणे होर्डींग झळकावण्याची अघोरी स्पर्धाच सुरु केली.

वसमत रस्ता, जिंतूर रस्ता, गंगाखेड रस्ता तसेच मध्यवस्तीतील रेल्वे स्टेशन रस्त्यासह नानलपेठ कॉर्नर, छत्रपती शिवाजी चौक, गुजरी बाजार, गांधी पार्क, क्रांती चौक, अष्टभूजा चौक, नारायण चाळ कॉर्नर तसेच छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळा परिसरात शेकडो बेकायदा होर्डींग खूलेआमपणे झळकविल्या जात आहेत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, महात्मा ज्योतिबा फुले, वसंतराव नाईक यांच्या पुतळा परिसरातसुध्दा होर्डींगधारकांनी उच्छाद मांडला आहे. त्याचा परिणाम मुख्य चौक व रस्ते या होर्डींगमध्ये अक्षरशः लूप्त झाले आहेत. सर्वत्र छोट्या मोठ्या आकाराचे हे होर्डींग वाहतूकीच्या दृष्टीने धोकादायक ठरले असतांनासुध्दा राजकीय पक्षांच्या पुढार्यांसह कार्यकर्त्यांना त्याचे काडीचेही सोयर सुतक नाही, उलटपक्षी या राजकीय पक्षांचे आजी माजी लोकप्रतिनिधी व पुढारीच कार्यकर्त्यांना जागा दिसेल त्या ठिकाणी होर्डींग उभारण्याचा सल्ला देऊ लागले आहेत.

काही दिवसांपूर्वी वसमत रस्त्यावरील दुभाजकातील पोलवर एका मंत्र्याच्या स्वागताच्या प्रित्यर्थ झळकविलेल्या होर्डींगचा धक्का बसल्याने एका नागरीकास डोळा गमवावा लागला, परंतु त्या घटनेतून काही बोध घेण्याऐवजी राजकीय पक्षांच्या पुढारी व कार्यकर्त्यांनी महापालिकेच्या नाकावर टिच्चून दिसेल त्या ठिकाणी बेकायदेशीर होर्डींग झळकविल्याचे घाणेरडे प्रकार सुरुच ठेवले आहेत. एका विद्यमान लोकप्रतिनिधीने ओल्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर स्वतःच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एका प्रेसनोटद्वारे कार्यकर्त्यांना होर्डींग उभारु नका असा सल्ला दिला. त्या सल्ल्याचा उलटाच परिणाम झाला. संपूर्ण शहरभर कार्यकर्त्यांनी साहेबांना शुभेच्छा देण्याकरीता होर्डींग झळकवून निष्ठा व्यक्त केल्या. एकंदरीत या अघोरी स्पर्धेमुळे सपूर्ण शहर हे विद्रुप दिसू लागले आहे.

महानगरपालिकेचे आयुक्त नार्वेकर हे नुसते इशारे बहाद्दर ठरू लागले आहेत. इशारे देण्यापलिकडे ते या होर्डींगधारकांविरोधात कोणतीही दंडात्मक कारवाई करावयास आजपर्यंत धजावले नाहीत. त्यांच्या प्रमाणेच महापालिकेचे अन्य उपायुक्त व वरिष्ठ अधिकारी या बाबत मौन बाळगून बसले आहेत. दररोज ठिकठिकाणी मुख्य चौक व रस्त्यांवरील हे होर्डींग नजरेस पडून सुध्दा महापालिका मूग गिळून आहे. त्यामुळे संपूर्ण शहराचे जे आहे ते सौंदर्यीकरण नष्ट झाले आहे.

### धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शाळा आधुनिकीकरणासाठी अनुदान योजना

**परभणी,/प्रतिनिधी :** राज्यातील नोंदणीकृत शाळांच्या आधुनिकीकरणासाठी धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपरिषद व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी शासनाच्या अनुदान योजनेअंतर्गत सन २०२५-२६ साठी प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. या योजनेचा उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक आणि सोयीस्कर शिक्षणाचे वातावरण उपलब्ध करून देणे हा आहे.

राज्यातील नोंदणीकृत शाळांच्या आधुनिकीकरणासाठी धार्मिक अल्पसंख्याक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी अनुदानित/ विना अनुदानित/ कायम विना अनुदानित शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नगरपरिषद व अपंग शाळांमध्ये पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना सन २०२५-२६ मंत्रीमंडळाच्या मान्यतेनुसार शासन निर्णय क्रमांक अविवि-२०१५/ प्र.क्र.८०/१५/का-६ ०७ ऑक्टोबर २०१५ अन्वये सदर योजने अंतर्गत पात्र शाळांची शासनास अनुदानासाठी शिफारस आहे.

### काँग्रेसजणांनो चार-सहा महिने महत्वाचे- आ.सुरेश देशमुख

## जिल्हाध्यक्ष बाबाजानी दुर्राणी यांचे स्वागत

**परभणी,/प्रतिनिधी :** येत्या चार-सहा महिन्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका अत्यंत महत्वपूर्ण आहेत. त्यामुळे पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी या चार-सहा महिन्यांचे महत्व ओळखून अंग झटकून कामास लागावे, असे आवाहन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सुरेश देशमुख यांनी केले.



काँग्रेसच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे गुरुवारी (दि.३०) जिल्हा काँग्रेस कमिटीच्या कार्यालयात जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी माजी आमदार देशमुख, ज्येष्ठ नेते भगवानराव वाघमारे, महानगर जिल्हाध्यक्ष नदीम इनामदार, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, अमोल जाधव, माजी नगराध्यक्ष बंडू पाचलिंग, माजी नगरसेवक सुनील देशमुख, विनोद कदम, माजी सभापती गुलमीर खान, रवि सोनकांबळे, गणेश घाडगे यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ नेते देशमुख यांनी निवडणूकांबरोबर काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीचा सुध्दा विषय समोर आहे. विशेषतः चार-सहा तालुक्यांमधील तालुकध्यक्ष पदासह शहराध्यक्ष पदाचाही विषय महत्वपूर्ण आहे. आपण त्या दृष्टीने आता सर्वतोपरि तयारी करणे गरजेचे आहे, असे ते म्हणाले. त्यामुळे आता जिल्हयात खऱ्या अर्थाने काँग्रेसचे आगामी होणाऱ्या निवडणूकांत दुर्राणीसाहेबांमुळे मोठया प्रमाणात जागा जिंकण्यात यश आले आहे.




परभणी- ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सौर ऊर्जा पंप योजनेचा आढावा घेण्यात आला. या बैठकीत महावितरणचे अधिकारी तसेच राज्यभरातील सौर कृषी पंप पुरवठादार दिसत आहेत.





